सुविचार
आप जितना कम बोलेंगे, दूसरे व्यक्ति उतना ही अधिक ध्यान से सुनेंगे ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. २५ ऑगस्ट २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८४ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मोठी बातमी

नव्या पेन्शन योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी मोदी सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारने नव्या पेन्शन योजनेची घोषणा केली असून या योजनेला आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. यूनिफाइड पेन्शन स्कीम असं या योजनेचं नाव आहे. या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार आहे. या योजनेमुळे जवळपास २३ लाख कर्मचाऱ्यांना फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

खरं तर मागच्या काही वर्षांपासून सरकारी कर्मचाऱ्यांकडून सातत्याने पेन्शन योजनेत सुधारणा करण्याची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार मोदी सरकारने नव्या पेन्शन योजनेसाठी डॉ. सोमनाथ यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. काही दिवसांपूर्वीच या समितीने सरकारकडे त्यांचा अहवाल सादर केला होता. या अहवालाच्या आधारे केंद्र सरकारने आज मंत्रिमंडळाच्या नव्या पेन्शन योजनेला मंजुरी दिली.

सरकारने दिलेल्या माहितीनुसार, या योजनेंतर्गत सरकारी कर्मचाऱ्यांना निवृत्तीपूर्वीच्या शेवटच्या वर्षातील वेतनाच्या किमान ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून दिली जाणार आहे. याशिवाय जर पेन्शनधारकाचे निधन झाले, तर त्याच्या कुटुंबाला मृत्युवेळी मिळणाऱ्या पेन्शनच्या ६० टक्के रक्कम दिली जाणार आहे. तसेच नोकरदाराने १० वर्षांच्या सेवेनंतर नोकरी सोडली, तर त्याला १० हजार रुपये पेन्शन मिळेल, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. महत्त्वाचे म्हणजे कर्मचाऱ्यांना नॅशनल पेन्शन स्कीम तसेच यूनिफाइड पेन्शन स्कीम यापैकी कोणतीही एक योजना स्वीकारण्याचा

पर्याय देण्यात आल्याचही त्यांनी सांगितले.

या योजनेव्यतिरिक्त केंद्र सरकारने आजच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत विज्ञानधारा योजनेलाही मंजुरी दिली आहे. तसेच बायो ई-३ धोरणालाही मंजुरी देण्यात आली आहे. इकोनॉमी, इम्पलयॉमेंट आणि इनव्हॉर्नमेंट या तीन तत्वानुसार ई-३ धोरणात काम होईल, असं मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले आहे. **(पान ७ वर)**

पहिली 'वंदे भारत स्लीपर एक्स्प्रेस' धावण्यासाठी सज्ज

नवी दिल्ली : वंदे भारत स्लीपर ट्रेनची प्रतीक्षा आता संपली असून वंदे भारत रेल्वे गाड्यांच्या यशानंतर लवकरच वंदे भारत स्लीपर गाड्या येणार आहेत. भारताची पहिली वंदे भारत ट्रेन चालू वर्षाच्या शेवटीपर्यंत सुरु होईल, अशी माहिती रेल्वे अधिका-यांनी दिली.

वंदे भारत ट्रेनमधल्या सीरिजचे वंदे भारत स्लीपर ट्रेन हे तिसरे व्हर्जन असेल. वंदे भारत सीरिजच्या रेल्वेगाड्यांमध्ये चेअर कार ट्रेन आणि गुजरातमधली वंदे मेट्रो गाड्यांचा समावेश आहे. इंटीग्रल कोच फॅक्ट्री चेन्नईचे महाप्रबंधक यू. सुब्बा

राव यांच्या माहितीनुसार, पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन पुढच्या महिन्यापर्यंत तयार होईल. मनी कंट्रोलसोबत झालेल्या चर्चेमध्ये राव म्हणाले की, पहिल्या वंदे भारत ट्रेनची निर्मिती भारत अर्थ मुव्हर्स लिमिटेडच्या बंगळूरु येथील वर्कशॉपमधून होईल. २० सप्टेंबरपर्यंत या ट्रेनची निर्मिती होण्याचा अंदाज आहे. राव पुढे म्हणाले की बीईएमएलकडून रेल्वे डब्यांची बांधणी होत आहे. आम्हाला आशा आहे की, २० सप्टेंबरपर्यंत डबे चेन्नईतल्या आयसीएफमध्ये पोहोचतील. त्यानंतर रेक निर्मिती, अंतिम परीक्षण आणि इतर कामे उरकली जातील. त्यासाठी साधारण १५ ते २० दिवस लागू शकतात. त्यानंतर मुख्य लाईन परीक्षण होईल, त्यात दोन महिने जातील.

मे २०२३ मध्ये आयसीएफ चेन्नईने बीईएमएल लिमिटेडला १६ कारच्या वंदे भारत स्लीपर ट्रेनचे १० रेक डिझाईन आणि निर्माण करण्यासाठी आदेश दिले होते. ही ट्रेन १६० किलोमीटर प्रतितास या वेगाने धावण्यासाठी सक्षम आहे. राव म्हणाले की, ही पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन आहे, म्हणूनच त्यासाठी जास्तीचा वेळ खर्ची पडत आहे. युरोपीय मानकांना खरी उतरणारी ही ट्रेन असेल. डिसेंबर २०२४पर्यंत सर्व तपासण्या आणि ट्रायल रननंतर स्लीपर ट्रेन प्रवाशांसाठी ट्रेन धावणार आहे.

लाडकी बहीण योजना 'या' राज्यांतही सुरू

मुंबई:- महिला मतदारांना आकर्षित करण्याकरता महाराष्ट्रात राज्य सरकारकडून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत दरमहा १५०० रुपये पात्र महिलांच्या खात्यात जमा केली जात आहेत. आतापर्यंत जवळपास १.५ कोटी महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले असून या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी असलेली मुदतीची चौकट काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे महिला आता केव्हाही अर्ज करू शकणार आहेत. त्यामुळे पात्र महिलांची संख्या आणि या योजनेसाठी सरकारचं बजेटही वाढत जाणार आहे. दरम्यान, अशी योजना राबवणारं महाराष्ट्र हे एकमेव राज्य नाही.

देशभरातील एकूण सात राज्यांमध्ये महिलांसाठी अशा पद्धतीच्या थेट लाभ हस्तांतरण (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर -) योजना सुरू करण्यात आल्या आहेत. अशा योजनांमुळे महिलांच्या खात्यात थेट पैसे जमा होत असल्याने त्यांची कुटुंबातील आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता वाढली आहे, असं प्रख्यात अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांच्या प्रचिती ट्रस्टने केलेल्या अहवालातून आढळून आलंय. त्यामुळे थेट लाभ हस्तांतरण पद्धत सुरू असलेल्या राज्यातील योजनांविषयी जाणून घेऊयात. महत्त्वाचं म्हणजे यातील बहुतेक राज्यांमध्ये आगामी काळात विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत.

राज्याचे अर्थमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली. १ जुलैपासून ही योजना सुरू झाली असून २१ ते ६५ वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २.५ लाखांपेक्षा कमी असलेल्या महिला या योजनेसाठी पात्र असणार आहेत. पात्र **(पान ७ वर)**

२६ ऑगस्टपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात अति मुसळधार पाऊस

पुणे : मागील दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरूच आहे. आज देखील राज्यातील बहुतांश भागात जोरदार पाऊस बरसला. आज शनिवार दि. २४ ऑगस्ट सकाळ ते सोमवार दि. २६ ऑगस्टच्या सकाळपर्यंतच्या ४८ तासांत संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

ज्येष्ठ निवृत्त हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तविलेल्या हवामान अंदाजानुसार पुढील ४८ तासात अति जोरदार पाऊस बरसण्याची शक्यता आहे. त्यानुसार विशेषत: नंदुरबार, धुळे, जळगांव, नाशिक, अहमदनगर, छ. संभाजीनगर, पुणे, सातारा, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा १४ जिल्ह्यात पुढील ४८ तासात तर अतिजोरदार पावसाचीही शक्यता जाणवते. रविवार दि. २५ ऑगस्टपासून सह्याद्री कुशीतील नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावरील धरणांतून होणा-या जलविसर्गाच्या शक्यतेतून, **(पान ७ वर)**

शिखर धवनने जाहीर केली निवृत्ती

नवी दिल्ली : भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी सलामीवीर शिखर धवनने आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. क्रिकेट वर्तुळ आणि चाहत्यांमध्ये प्रेमाने (गब्बर) म्हणून ओळखल्या जाणा-या ३७ वर्षीय क्रिकेटपटूने आज सकाळी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरून ही घोषणा केली. धवनच्या या घोषणेमुळे त्याची क्रिकेटमधील एक शानदार कारकीर्द संपली. दरम्यान धवनच्या या घोषणेमुळे त्याच्या चाहत्यांना धक्का बसला आहे.

एका दशकाहून अधिक काळ भारतीय क्रिकेटमध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावणा-या शिखर धवनने आज सर्वांचे आभार मानले आणि क्रिकेटमधून

निवृत्ती जाहीर केली. शिखरने भारतासाठी पहिला एकदिवसीय सामना २०१० मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध विशाखापट्टणम येथे खेळला होता. त्याने १६७ सामन्यांत ६७९३ धावा केल्या. यात त्याच्या नावावर १७ शतके आणि ३९ अर्धशतके आहेत तर धवनने ६८ टी-२० सामन्यांत १७५९ धावा केल्या आहेत. त्याने मोहालीत ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिली कसोटी खेळली.

२०१३ पासून त्याने आतापर्यंत ३४ कसोटीमध्ये २३१५ धावा काढल्या. त्याची सर्वोच्च धावसंख्या १९० आहे. धवनने आयपीएलमध्येही खूप धावा केल्या. क्रिकेटच्या इतिहासातील तो सर्वांत यशस्वी फलंदाजांपैकी एक आहे. सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत तो विराट कोहलीनंतर दुस-या क्रमांकावर आहे. धवनने २२२ आयपीएल सामन्यांमध्ये ६७६९ धावा केल्या आहेत. यात त्याने **(पान ७ वर)**

मुंबईत उद्धव ठाकरेंची शिवसेनाच मोठा भाऊ असणार

महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा फॉर्म्युला समोर

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपासंदर्भात मुंबईत महाविकास आघाडीची बैठक पार पडली. या बैठकीत आगामी विधानसभेसाठी जागा वाटपाच्या रणनितीवर चर्चा झाली असल्याची माहिती आहे. मुंबईत महाविकास आघाडीतून उद्धव ठाकरेंची शिवसेना सर्वाधिक जागा लढणार आहे. याबाबत महाविकास आघाडीतील इतर पक्ष सकारात्मक आहेत. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेने २० ते २२ जागांवर दावा ठोकलाय, याबाबतची माहिती विश्वसनीय सुत्रांनी दिलीये.

शिवसेना ठाकरे गटाकडून ३६ विधानसभा मतदारसंघांपैकी

२० ते २२ जागांसाठी आग्रह

मुंबई झालेल्या महाविकास आघाडीच्या बैठकीत मुंबईतील विधानसभा मतदारसंघाबाबत चर्चा झाली. महाविकास आघाडीत मुंबईत शिवसेना ठाकरे गटच जागा वाटपात मोठा भाऊ असणार आहे. शिवसेना ठाकरे गटाला अधिक जागा देण्यासंदर्भात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष सकारात्मक आहे. शिवसेना ठाकरे गटाने ३६ विधानसभा मतदारसंघांपैकी २० ते २२ जागांसाठी आग्रह धरला आहे. काँग्रेस पक्ष हा १३ ते १५ जागांवर आग्रही असल्याची सूत्रांची माहिती आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार **(पान ७ वर)**

लातूर : शहरातील प्रसिद्ध पादत्राणे व्यावसायिक फैयाजभाई पटेल यांच्या निवासस्थानी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी भेट दिली. यावेळी फ्रुट असोसिएशनचे अध्यक्ष रियाज पटेल, ॲड. शफी सर, पत्रकार खय्युम शेख, राजेश्रवरजी बुके, अब्दुल शेख, नयूमजी पटेल, अनिलजी पतंगे, पृथ्वीसिंग बायस उपस्थित होते. या वेळी विविध विषयांवरही चर्चा झाली.

पुण्यात पौड भागात हेलिकॉप्टर कोसळले

पुणे : प्रतिनिधी -पुण्यात पौड भागात घोटोडे भागाच्या हद्दीत एका डोंगराजवळ हेलिकॉप्टर कोसळले. उड्डाण केल्यानंतर काही वेळातच हेलिकॉप्टर दुर्घटनाग्रस्त झाल्याची माहिती आहे. हेलिकॉप्टरमध्ये ४ प्रवासी होते, त्यापैकी दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झाली नसल्याचे वृत्त हाती आले आहे. स्थानिकांनी अपघात स्थळी धाव घेत मदत केली.

पुणे जिल्ह्यातील पौड भागात हेलिकॉप्टर कोसळून अपघात झाला आहे. पुण्यात दिवसभर पावसाचा जोर होता. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर पडल्याचा अंदाज आहे. पोलिस घटनास्थळी पोहचले आणि बचाव यंत्रणाही दाखल झाल्या. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार पुण्यातील पौड भागात गारवा हॉटेलजवळ एक हेलिकॉप्टर अचानक आकाशात गिरक्या खाताना दिसले. त्यानंतर आवाज झाला आणि हेलिकॉप्टर जमिनीवर कोसळले. अपघातग्रस्त हेलिकॉप्टरमध्ये चार प्रवासी होते. त्यापैकी दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.

खरोळा येथील देवीच्या मंदिरासमोर सभागृहाच्या बांधकामाचा ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शुभारंभ

लातूर दि.२४ - भारतीय जनता पार्टीचे नेते विधान परिषदेचे सदस्य आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या स्थानिक आमदार विकास निधीतून खरोळा येथील वडाची देवी मंदिर परिसरात सभागृह बांधकामासाठी दहा लक्ष रुपयाचा निधी देण्यात आला असून या सभागृह बांधकामाचा भूमिपूजन भाजपाचे युवा नेते मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात झाला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गावागावात वाडी वस्तीत भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून अनेक विकास कामांना विविध योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी मिळाला. मिळालेल्या निधीतून विकासाची कामे सर्वत्र होत आहेत त्याचाच एक भाग स्थानिक आमदार विकास निधीतून खरोळा येथील वडाची देवी मंदिर परिसरात भाविकांच्या मागणीनुसार सभागृह बांधकामासाठी १० लाख रुपयांचा निधी आ. कराड साहेब यांनी मंजूर केला. सदरील सभागृह बांधकामाचा शुभारंभ भाजपाचे युवा नेते माननीय ऋषिकेश दादा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी करण्यात आला.

खरोळा येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दत्त मंदिर देवस्थानास आमदार रमेश आप्पा कराड साहेब यांनी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा मिळवून दिल्याने या मंदिर परिसरात विविध विकास कामाबरोबरच भाविक भक्तांना मोठ्या प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध होतील असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विकासाला खऱ्या अर्थाने आ. रमेश आप्पा कराड साहेब यांच्या माध्यमातून गती मिळाली असल्याचे बोलून दाखविले.

यावेळी भाजपा पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, माजी जिप सदस्य सुरेंद्र गोडभरले, रमाकांत फुलारी, बाळाप्पा हेणे, बालाजी मानमोडे, हनुमंत राऊतराव, मोहन राऊतराव, **(पान ७ वर)**

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांना 'डीएसटीए'चा सारवर उद्योग गौरव पुरस्कार प्रदान

लातूर प्रतिनिधी -द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) इंडियाने २०२४ वर्षातील प्रतिष्ठित बेस्ट शुगर फॅक्टरी अवॉर्ड हा पुरस्कार विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखाना परिवारातील विलास सहकारी साखर कारखाना युनिट - २, तोंडार, उदगीर येथील कारखान्यास प्रदान केला, हा सहकार आणि साखर उदयोगातील मानाचा पुरस्कार माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी कारखान्याचे संचालक मंडळ, कार्यकारी संचालक यांनी डीएसटीएच्या वार्षिक अधिवेशनाच्या कार्यक्रमात पुणे येथे स्विकारला.

द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) इंडियाचे गळीत हंगाम २०२३-२४ साठीच मानाच राज्यस्तरीय बेस्ट शुगर फॅक्टरी अवॉर्ड पारीतोषिकासाठी विलास सहकारी साखर कारखान्यानी केलेल्या कामगिरीचे मुल्यमापन करूनच या पारीतोषिकासाठी निवड करण्यात आली होती. सदरील पारीतोषीक शनिवार

दि. २४ ऑगष्ट २४ रोजी पुणे येथील सभागृह, जे. डब्ल्यू. मॅरियट सेनापती बापट रोड येथे डीएसटीएच्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन सत्रादरम्यान माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि राज्यातील मान्यवरांच्या हस्ते स्विकारण्यात आले.

कारखान्याच्या वतीने हा पुरस्कार माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक आत्माराम पवार, संचालक सर्वश्री गोविंद बोराडे, अनंत बारबोले, नारायण पाटील, बाळासाहेब बिडवे, अमर मोरे, रंजित पाटील, भैरवनाथ सवासे, गुरूनाथ गवळी, गोविंद डुरे, अमृत जाधव, भारत आदमाने, रामदास राऊत, सुभाष माने, संजय पाटील खंडापूरकर, कल्याण पाटील, ग्यानोबा गोडभरले, पंडीत ढगे, विनोबा पाटील, संदिप पाटील, मन्मथअप्पा किडे, संतोष तिडके, मारोती पांडे, कारखान्याचे अधिकारी अजय कोळगे, देविदास मोकाशे, सुनिलकुमार चापूले, राजेसाहेब खोसे, तानाजी गुमनार, किशन चौधरी, संदिप शिंदे आदीनी स्विकारला. **(पान ७ वर)**

आत्मबोध २

सर्व भूतांत परमात्मा ।
दिसे ज्या जीवात्मा ।
म्हणावे त्या आत्मा ।
सात्विक ज्ञान ।।१ ।।

सर्वांत पाही भेद ।
त्यासी होई खेद ।
हेची सांगे वेद ।
राजस ज्ञान ।। २ ।।

ज्यासी नसे आत्मज्ञान ।
विधी निषेधाचे अज्ञान ।
नसे कशाचे भान ।
तामस ज्ञान ।। ३ ।।

ज्ञानाचे तीन प्रकार ।
अज्ञानी नुसता भार ।
जाणुया निराकार ।
आपण सर्व ।। ४ ।।

-सिद्धदास, सोलापूर

लाहोटी स्कूल मध्ये राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा

लातूर/ प्रतिनिधी- राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये शुक्रवारी मोठ्या उत्साहात पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा करण्यात आला. गेल्या वर्षी याच दिवशी भारताला चांद्रयान-३ मोहिमेत यश मिळाले होते. भारताने चंद्राच्या पृष्ठभागावर विक्रम लँडरचे सॉफ्ट लँडिंग यशस्वीरित्या पूर्ण केले होते. हा दिवस भारताची ऐतिहासिक कामगिरी म्हणून चिन्हांकित करतो. या दिवशी भारत देश चंद्रावर रोव्हर उतरवणारा जगातील चौथा आणि दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ उतरणारा पहिला ठरला. चंद्र मोहिमेत मोठे यश मिळविल्यानंतर, भारत सरकारने अवकाश संशोधनातील भारताच्या वाढत्या पराक्रमाचे स्मरण म्हणून अधिकृतपणे २३ ऑगस्ट हा राष्ट्रीय अतंराळ दिवस म्हणून घोषित केला.

रजिस्ट्रार प्रवीण शिवनगीकर, मनोहर कबाडे आणि अरुल शेल्वी यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती . अनुश्री सोमानी विद्यार्थिनीने राष्ट्रीय अंतराळ दिनाची माहिती दिली. उर्वी हुडेने कविता सादर केली. अथर्व मुंदडा आणि इशान सोनी यांनी चंद्रयान मिशन्स १, २ आणि ३ यावर सादरीकरण केले. अर्णव लाहोटी, मल्हार बगाटे, स्वरित खटोड, आदित्य राठी, अपूर्व गटागट आणि वरद जकोटिया यांनी आकर्षक मॉडेल्स तयार करून प्रदर्शन केले. शाळेच्या परिसरात माहितीपूर्ण चार्ट्स लावण्यात आले.

विद्यार्थ्यांना अंतराळ संबंधित व्हिडिओ द्वारे माहिती देंण्यात आली , प्रश्न मंजुषा, ड्रॉईंग व पेंटिंग, फॅन्सी ड्रेस, निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. मंजुषा पाटील, स्नेह गोमारे, तुकाराम डिगोळे कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

स्वत: सोबत इतरांचा आदर करा: प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई

लातूर / प्रतिनिधी- आपल्याला निरोगी, सुदृढ, सक्षम आणि आनंदी जीवन जगायचे असेल तर स्वत:सोबत इतरांचा आदर केला पाहिजे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभागातर्फे समाजकार्य पंधरवडा अंतर्गत शिव्या मुक्त अभियान या कार्यक्रमांतर्गत इतरांचा आदर.... महिलांचा सन्मान या विषयावरील समारोप समारंभ महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये संपन्न झाला यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

यावेळी विचारमंचावर प्रा. काशिनाथ पवार, प्रा. आशिष स्वामी, प्रा. भाग्यश्री भुजबळ, आणि प्रा. प्रकाश राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. पुढे बोलताना प्राचार्य प्रभारी डॉ. गवई म्हणाले की, आज आपण सर्वांनी व्यावसायिक समाजकार्याच्या अभ्यासाच्या माध्यमातून समुदाय शिव्यामुक्त झाल्याने समृद्ध आणि लोकशाही राष्ट्र निर्माण होईल. आपण एक उत्कृष्ट व्यावसायिक समाजकार्यकर्ता बनाल. महाराष्ट्रातील सर्व समाजकार्य महाविद्यालये आणि मास्वे संघटनेने समाजकार्य पंधरवड्याच्या माध्यमातून शिव्या मुक्त अभियान, इतरांचा आदर, महिलांचा सन्मान या अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध १४ उपक्रमाची माहिती देऊन याद्वारे खऱ्या अर्थाने आपल्या देशात सौंदर्यपूर्ण वातावरण निर्माण होण्यास मदत होईल असे सांगून त्यांनी मासवे संघटनेचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. काशिनाथ पवार यांनी केले. तर आभार प्रा. भाग्यश्री भुजबळ यांनी मानले. या कार्यक्रमात अनिल मुंडे, माने आकांक्षा, अंजली गर्जे, काळे शिवानी, प्रशांत सुरवसे या विद्यार्थ्यांनी शिव्या मुक्त अभियान, इतरांचा आदर, महिलांचा सन्मान या उपक्रमाविषयी विविध क्षेत्रकार्य संस्था व समुदायात घेतलेल्या कार्यक्रमाचा आढावा आपल्या मनोगत आतून व्यक्त केला. या कार्यक्रमाला समाजकार्य विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वात शेवटी सामूहिक राष्ट्रगीताने समाजकार्य पंधरवाडा या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. दिनेश मौने, प्रा. नागेश जाधव, प्रा. दत्ता करंडे, नंदू काजापुरे, बालाजी डावकरे, संतोष येचेवाड, आनंद खोंपे यांनी परिश्रम घेतले.

कर्माचा हिशोब प्रत्येकाला चुकता करावा लागतो : ज्ञानराज महाराज

अॅड. शाम कुलकर्णी

औसा / प्रतिनिधी- केले कर्म तेच भोगा आले. उपजले मेले ऐसे किती.. जे कर्म कराल ते फेडावेच लागतात, त्याचा हिशोब चुकता होणारच आहे. नर करणी करे तो नर का नारायण बन जाये.. आपण काय व्हायचे हे ठरवावे आणि तसे कर्म करण्याचा प्रामाणिक प्रयत्न नित्याने करावा असा उपदेश ह भ प ज्ञानराज महाराज यांनी केला आहे.

श्रावणमास अनुष्ठानात नाथ मंदिरातील सायंकाळच्या नित्य चक्रीभजन उपासनेनंतर ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी च्या निरूपणात ते बोलत होते सेवेकरता १८ व्या अध्यायातील ९ व्या श्लोकातील ५,६,७,८, या ओव्यांच्या अनुषंगाने उपस्थित फक्त शिष्य श्रोत्यांशी संवाद साधताना महाराज बोलत होते. एवढी गोष्ट लक्षात घ्या जनावरां च्या शरीराचा प्रत्येक अवयवांचा त्याच्या मृत्यूनंतर काही ना काही उपयोग होतो पण मनुष्याची शरीर हेच दहन किंवा दफन करावे लागते , शरीर नाशवंत आहे हे आपल्याला भाग्याने लाभले आहे हे माहीत असून देखील आपण कर्माकडे जागृतपणे बुद्धीने लक्ष देत नाही, ती देणे म्हणजेच सत्कर्मासाठी मन बुद्धी चित्त वृत्ती क्रिया ही चांगली योग्य करणे होय. मनाची शुद्धता सात्विकता एकाग्रता प्रसन्नता शुद्धता,दृढता, सातत्यता, सत्यता मधुर वाणी असणे खूप गरजेचे आहे. आपल्या कर्मातून आपल्या साधना उपासना नामस्मरण व तपातून मनुष्य नराचा नारायण होऊ शकतो हे संत सत्पुरुषांनी आपल्याला दाखवून दिले आहे . म्हणून जीवनात आळस टाकून द्या मन बुद्धीने ताजेतवाने व्हा, सावध जागृत व्हा, सद्बुद्धी विवेक नम्रता संयम धारण करा आणि आपली नित्य कर्म ही सत्कर्मच घडतील याची दक्षता घ्या मग आपण माऊलींच्या तत्त्वानुसार फलश्रुतीस पात्र ठराल असे महाराज म्हणाले. आपण जेवलात तर आपलेच पोट भरते दुसऱ्याचे नाही तसे कर्माचे आहे आपण केलेले कर्म हे चुकते केल्याशिवाय आपले गती नाही हे ध्यानी धरावे. म्हणून सेवा साधने आपला जीव ओवाळून टाकायला हवा तरच ती समर्पित अशी सेवा गुरुचरणी

रुजू होऊ शकेल, व गुरूंच्या कृपा आशीर्वादाने साधनेच्या फळावर आपण भगवंत चरणा जवळ पोहंचू शकतो हा विश्वास महाराजांनी दिला. श्री शहाजी अंबादास थोरात हे गेली कित्येक वर्ष श्रावण मास अनुष्ठान सकाळी श्री विठ्ठलाच्या आणि सद्गुरु समाधींच्या रुद्राभिषेक महापूजे वेळी देवासमोर चक्रीभजनाची सेवा रुजू करतात त्यांची आज माळ सेवा होते आहे त्यांचे चिरंजीव बालाजी यांनीही सेवा रुजू केली.

विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने आमची तयारी सुरू :डॉ.भागवत कराड

लातूर/प्रतिनिधी : २०२४ च्या विधानसभा निवडणुकांची तयारी आम्ही सुरू केली असून, जवळपास ९८ हजार १०० बूथ रचना,संयोजन,मतदार यादी वाचन व दुरुस्ती याची जबाबदारी भारतीय जनता पार्टीच्या वतीने आमच्यावर टाकण्यात आली असल्याची माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ.भागवत गरड यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

प्रवीण साले हे बूथ समन्वय समितीचे प्रमुख असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विधानसभा निवडणुक २०२४ च्या कामाचे भारतीय जनता पार्टीच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. केंद्रात मोदी सरकारच्या वतीने चार सेक्टरवर काम करण्यात आले असून त्यात महिला, शेतकरी,युवा,गरीब यांचा प्रामुख्याने समावेश असल्याचे डॉ. कराड यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या धर्तीवरच महाराष्ट्रातील महायुतीचे सरकार काम करत असून महाराष्ट्रातील साडेबारा कोटी जनतेला सशक्त बनवण्याचे काम महायुती सरकार करत असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले.

नुकतीच महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना राबवण्यास सुरुवात केली आहे, या अगोदर उत्तर प्रदेश सरकारने ही योजना यशस्वी केल्यानंतर, आता महाराष्ट्रातही ही योजना पुढची पाच वर्षे चालणार आहे. विरोधी पक्षाकडून या योजनेसंदर्भात संभ्रम निर्माण केला जात असून, फेक नरेटीव सेट करण्याचा प्रयत्नही ते करत असल्याची टीका डॉक्टर भागवत कराड यांनी केली. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी विरोधकांनी संविधान बदलणार असा फेक नरेटिव्ह सेट केल्यामुळे भाजपला लोकसभा निवडणुकीत फटका बसला असल्याचेही ते म्हणाले. देशाचे प्रधानमंत्री कुठल्याही कामाची सुरुवात करताना राज्यघटनेला वंदन करूनच करतात असेही ते म्हणाले. युती सरकारकडून तीन गॅस सिलेंडर मोफत देण्याची योजना सुरू आहे, राज्यातील युवकांना प्रशिक्षण देत असताना मानधन देण्याची योजना, देशातील बेरोजगार युवांना मुद्रा लोन योजनेच्या माध्यमातून पूर्वी दहा लाख रुपये अर्थसाह्य दिले जायचे, परंतु त्यामध्ये वाढ करून आता वीस लाख रुपये देण्यात येणार आहेत.

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री किसान योजनेच्या धर्तीवर राज्य सरकारच्या वतीने नमो किसान योजना सुरू करण्यात आली आहे. गरीबांना स्वस्त दरात अन्नधान्य वाटपाच्या माध्यमातून २५ कोटी कुटुंबांची गरिबी हटवली, पुन्हा ते कुटुंब गरिबीच्या गर्तेत ओढले जाऊ नयेत म्हणून ही योजना सुरूच ठेवली असल्याचेही त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे आयुष्यमान कार्डद्वारे मोफत उपचार सुरू करण्यात आले. दरम्यान येणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुती सरकारने केलेल्या कामाच्या जीवावरच राज्यात जवळपास १८० ते २०० च्या आसपास जागा निवडून येतील असेही ते म्हणाले.यावेळी भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, दिलीपराव देशमुख भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष, प्रवीण कस्तुरे यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रॅगिंग ही विद्यार्थी जीवनाला घातक: पो .नि .विठ्ठल दराडे

प्रशांत तांबोळकर

शिरूर अनंतपाळ : न्टी रॅगिंग ही विद्यार्थी जीवनाला घातक असुन , न्टीरॅगिंग मुळे आनेक विद्यार्थ्यांने आपले जिवन संपवले तर कांहीने शिक्षण सोडून दिले आहे . याला पायबंद घालण्यासाठी शासनाने अनेक कठोर कायदे केलेले आहेत . या कायद्याची जन जागृती करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि २२ ऑगस्ट २०२४ रोजी ' न्टी रॅगिंग प्रतिबंधीत कायद्या वर ' शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांचे व्याख्यान आयोजीत केले होते . यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरुन धालगडे, प्रमुख मार्गदर्शक पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे ,डॉ . मारोती गायकवाड , रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ अमोल इंगळे, डॉ. पांडुरंग मुठ्ठे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती .

पुढे बोलताना ते म्हणाले की अँटी रॅगिंग कायद्याची माहिती देताना ते म्हणाले विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आपल्या करिअर कडे लक्ष द्यावे.रॅगिंग होत असल्यास लपून न ठेवता ते प्राचार्य व प्राध्यापकांना सांगावे.मानसिक किंवा शारीरिक छळ हे विघातक कृत्य आपल्या हातून होणार नाही याची काळजी घ्यावी. विशेषता अँटी रॅगिंग ही शहरी भागातील इंजिनिअरिंग ,मेडिकल कॉलेज मध्ये अधिक प्रमाणात होत असते .तरीपण त्याचे लोन ग्रामीण भागापर्यंत पसरले असल्यामुळे विधार्थ्या मध्ये ण्टी रॅगिंग कायदयाची जनजागृती व्हावी म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रा .डॉ मारोती गायकवाड यांनी अँटी रॅगिंग या विषयावर बोलताना रॅगिंग प्रतिबंधात्मक कायदायांचे अनुपालन करण्यास सांगितले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे, तरच जीवन यशस्वी होईल असे आपल्या मार्गदर्शनातून मत व्यक्त केले. यावेळी अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ अरुण धालगडे यांनी केले . यावेळी कार्यक्रमात संविधानाचे शिल्पकार तथा पहिले कायदा मंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व अँटि रॅगिंग पोस्टरचे प्रकाशन हे प्राचार्य डॉ.ए.बी.धालगडे व पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो चे कार्यक्रम अधिकारी डॉ अमोल इंगळे यांनी केले. तर आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.पांडुरंग मुठ्ठे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व प्राध्यापक प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

तालुका स्तरीय कबड्डी स्पर्धेत बापूजी विद्यालय सुयश

अहमदपूर / प्रतिनिधी: तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा मध्ये १७ वर्षे वयोगटात मुली बापूजी विद्यालय सावरगाव रोकडा संघ तालुक्यात सर्व प्रथम आला आहे संघातील खेळाडू शिवानी प्रवीण घोगरे, सायली सुनील घोगरे, प्रगती इंद्रजीत घोगरे, श्रेया जयसिंग जाधव, दीक्षा माधवराव रायवाडे, स्वप्नजा श्रीसागर वाघमारे, ऋतुजा राजेंद्र बंडेवाड, स्नेहा अंतराम नायने, सुप्रिया सूर्यकांत बुधवारे, साक्षी संतोष बेल्लाळे, सोनाली जगन्नाथ जाधव, प्रतीक्षा विजय बेल्लाळे. या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करून शाळेचे व गावचे नाव उंचावले या विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडा शिक्षक लक्ष्मण उदगिरे यांचे मार्गदर्शन लाभले .

या विजया बद्दल संस्थेचे सचीव डी.बी.लोहारे गुरूजी ,संस्थेच्या सह सचिव सौ. सुनिताताई चवळे संस्थेचे अध्यक्ष डा. अशोकरावजी सांगवीकर शाळेचे मुख्याध्यापक राजकुमार घोटे पर्यवेक्षक जयप्रकाश हराळे व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व गावातील क्रीड़ा प्रेमी नागरिकांनी शाळेचे मुलीच्या विजयी संघाचे व मार्गदर्शक उदगीरे सरांचे अभिनंदन केले.

ट्रॅव्हल्स बुकिंगचे तिकीट रद्द करण्यावरून ट्रव्हल्स एजंन्टास मारहान करून दुकानाचे नुकसान

पाच जनविरोधात पोलीसात गुन्हा दाखल: फरार आरोपीस अटक

प्रशांत तांबोळकर

शिरूरअनंतपाळ : शहरातील बसवेश्र्वर चौकात असलेल्या सुरेश साखरे यांचे साई सर्विस ट्रॅव्हल्स बुकिंग चे दुकान आहे . त्या दुकानात दि २० ऑगस्ट २०२४ रोजी सांयकाळी ५ .३० वा च्या सुमारास आरोपी विनोद अशोक चिंचोले याने शिरूर अनंतपाळ ते पुणे असे केलेली ट्रॅव्हल्स बुकिंग रद्द का करीत नाही . या कारणावरुन फिर्यादीस फोन वरून शिवीगाळ करुन त्याचे सांगण्यावरुन सांयकाळी ५.३० वाजण्याचे सुमारास पाच जणानी येऊन दुकानदारास अमानूष मारहान करून दुकानाचे नुकशान केल्या वरून शिरूर अनंतपाळ पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

शिरूर अनंतपाळ पोलीसा कडून दिलेली माहिती अशी की शहरातील बसवेश्र्वर चौकात सुरेश साखरे यांचे साई सर्विस व ट्रॅव्हल्स बुंकीग चे दुकान आहे येथे श्रीराम पार्टी पुणे या ट्रॅव्हल्स चे तिकीट बुकिंग केले होते . ते रद्द करण्यासाठी दुकानदारास विनवणी केली पण दुकानदार बुक केलेले तिकीट रद्द का करत नाहीस म्हणून आरोपी ३ विनोद अशोक चिंचोले यांच्या सांगण्या वरून आरोपी प्रविण महादेव भुरे ,सोनु माळी, तेजस किशनराव पाटील एक अनोळखी यांनी दुकानात येवुन आरोपीने शिरुर अनंतपाळ ते पुणे असे केलेली ट्रॅव्हल्स बुकींग रद्द का होत नाही या कारणावरुन अश्रिलल शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली व दुकानातील काउंटर वरील काचा फोडल्या तसेच फिर्यादीच्या डोक्यात मारुन जखमी केले टेबलवर असलेली दोन्ही कॉम्प्युटर उचलुन खाली आपटले व नागेश इंद्राळे याच्या हातातील अंदाजे ७ हजार ५०० शे रु रोख रक्कम आरोपीने हिसकावून घेतली त्यावेळी दुकानाचे बाहेरुन दोन अनोळखी इसमाने दुकानाकडे दगड भिरकावून फेकुन काऊंटर वरील कॉम्प्युटर चे स्क्रिन फोडून नुकसान केले आहे. त्यामुळे फिर्यादीचे दुकानातील तिन कॉम्प्युटर चे एकुण अंदाजे ५००००/- रुपये चे नुकसान झाले असुन . फिर्यादी सुरेश साखरे यांच्या फिर्यादी वरून वरील आरोपी च्या विरुद्ध गुन्हा दाखल करुन फरार आरोपीस दि २३ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आले आहे पुढील तपास पो. नि.सो. यांच्या आदेशाने पुढील तपास पोहका घाडगे करीत आहेत .

गुन्हेगारावर कडक कारवाई करावी

शहरातील सुरेश साखरे यांच्यावर केलेल्या हल्लाची दखल घेण्यात यावी यासाठी व्यापारी संघ शिरूर अनंतपाळच्या वतीने पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांना निवेदन देऊन योग्य ती कार्यवाही करावी व अजनी चौकातील पोलीस चौकीमध्ये कायमस्वरूपी कर्मचारी देण्यात यावा , बसवेश्र्वर चौक हे शिरूर आनंतपाळ चा मुख्य चौक आहे . हे वरदळीचे ठिकाण असल्यामुळे त्यांची गंभीर दखल घ्यावी अन्यथा व्यापारी संघटना आंदोलनाच्या पवित्रात आहे. निवेदन देताना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ओमप्रकाश गलबले,उपाध्यक्ष मनोज दुरुगकर,सचिव गंगाधर चाकोते, व्यंकट धुमाळे, भरत दूरगकर, देवसटवार, प्रशांत येलमलवार,सोमा तोंडारे, सुनील कोरे, नागनाथ उंबरगे,संजय सलगरे, किरण तेललवार, इत्यादी उपस्थित होते.

यशवंत
धाराशिव जिल्हा
रविवार दि. २५ ऑगस्ट २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

वाशी येथे योजनांच्या प्रचार प्रसिध्दीसाठी मेळाव्यास प्रतिसाद

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – उत्कर्ष बहुजनांचा संकल्प बहुजन कल्याणाचा इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांच्या प्रचार प्रसिध्दीचा मेळावा वाशी येथील कर्मवरी मामासाहेब जगदाळे येथे २३ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडला.

दि.१५ ते ३१ ऑगस्टपर्यंत जिल्ह्यातील तालुक्याच्या ठिकाणी इतर मागास बहूजन कल्याण विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. वाशी येथील तालुकास्तरीय मेळाव्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक बी.जी. अरवत होते. तर अध्यक्ष म्हणून कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अरुण गंभीरे हे उपस्थित होते.

या मेळाव्यासाठी परंडा तालुक्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्गामधील विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. प्रा.नामदेव आंधळे व प्राचार्य पी.व्ही. शिनगारे यांनी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती उपस्थितांना देवून योजनेचा लाभ घेण्याविषयी आवाहन केले. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे निरीक्षक संदेश घुगे, तरंगे बालाजी, राहुल पेंढारकर आदी मान्यवर उपस्थित होते.प्रास्ताविक संदेश घुगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.एम.डी. उंद्रे यांनी तर आभार चंद्रकांत झोंबाडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

भाविकांची नवरात्र काळात गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी - डॉ. ओंबासे

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – श्री तुळजाभवानी मातेचा शारदीय नवरात्र महोत्सव ऑक्टोबरमध्ये दि. ३ ते १८ या कालावधीत होणार आहे. या कालावधीत विविध विभागांकडून यात्रेत व्यवस्था करण्यात येते.ही यात्रा व्यवस्था उत्तम असण्यासह महोत्सव दरम्यान भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी दि.२३ ऑगस्ट रोजी दिले.

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानच्या सभागृहात आगामी शारदीय महोत्सवासाठी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलिस अधिक्षक संजय जाधव, उपविभागीय अधिकारी संजय डव्हाळे, अति. पोलिस अधिक्षक गौहर हसन, उपविभागीय अधिकारी संजय डव्हाळे, उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख, तहसिलदार अरविंद बोळंगे, तुळजाभवानी मंदीर प्रशासकीय व्यवस्थापक तथा तहसिलदार माया माने, सहाय्यक धार्मिक व्यवस्थापक सिध्देश्वर इंतुले यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ.ओंबासे म्हणाले की, येणाऱ्या भाविकांना विविध सुचना देण्यात येवून तुळजापूरकडे येणाऱ्या सर्व रस्त्यावर महामार्गावर तसे फलक लावण्यात यावे.शहरात अनेक रिक्षा अनधिकृत असून त्या गॅसवर चालविण्यात येतात. त्यामुळे अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे. तसेच प्रवाशांची फसवणूक होणार नाही यासाठी रिक्षांचे दरपत्रक रिक्षा स्टँडवर लावण्यासह प्रवाशांची संख्या निश्चित करावी. संभाव्य अपघाताच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक कारवाईच्या सूचना यावेळी त्यांनी सहाय्यक प्रादेशिक अधिकाऱ्यांना दिल्या. शारदीय नवरात्र महोत्सव दरम्यान विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही या दक्षतेसह या काळात १ उपअभियंता व २ वायरमन यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करण्यासह मंदीरासाठी करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठयाचा वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देऊन ते म्हणाले की, ट्रान्सफार्मरवर येणारा लोड क्षमतेपेक्षा जास्त नसावा. शहरातील विजेचे केबल, बॉक्स, मेन बॉक्स उघडे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने बसेसची व्यवस्था करुन बसमुळे वाहतूक विस्कळीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. इतर सर्व विभागांना नेमून दिलेली कामे वेळेत पूर्ण करुन भाविकांची गैरसोय होणार नाही, तसेच शारदीय नवरात्र महोत्सव दरम्यान विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही या दक्षतेसह या काळात १ उपअभियंता व २ वायरमन यांची स्वतंत्रपणे नियुक्ती करण्यासह मंदीरासाठी करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठयाचा वीज पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देऊन ते म्हणाले की, ट्रान्सफार्मरवर येणारा लोड क्षमतेपेक्षा जास्त नसावा. शहरातील विजेचे केबल, बॉक्स, मेन बॉक्स उघडे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाने बसेसची व्यवस्था करुन बसमुळे वाहतूक विस्कळीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. इतर सर्व विभागांना नेमून दिलेली कामे वेळेत पूर्ण करुन भाविकांची गैरसोय होणार नाही, डॉ. ओंबासे दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी पोलिस निरीक्षक रवींद्र खांडेकर, तुळजापूरचे आगार व्यवस्थापक रामेश्वर शिंदे, मंदीर संस्थानचे अधिकारी – कर्मचारी तसेच विविध यंत्रणांचे अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

रस्त्यांच्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागांनी आपआपली जबाबदारी पार पाडावी असे सांगून ते म्हणाले की, तुळजापूर शहराकडे येणाऱ्या सर्व रस्त्यांची दुरुस्ती करुन घ्यावी. तसेच रस्त्याच्या कडेला वाढलेले गवत काढून तात्काळ त्या ठिकाणी मुरुम टाकण्याची व्यवस्था करावी. भाविकांना मार्गदर्शनासाठी विविध स्वरुपाचे फलक लावावेत, असे आवाहन त्यांनी केले.

स्थानिक संबंधिताबरोबर चर्चा अन् सुटला प्रश्न

शारदीय नवरात्र महोत्सवादरम्यान स्थानिकांना आपल्या दुचाकी घराकडे नेण्याचा मोठा प्रश्न निर्माण होत होता. यामुळे सुवर्णेश्वर गणपती मंदीराजवळ अनेक वेळा वाद निर्माण होत होता. यामुळे येथे बॅरेकेटींग लावण्यासाठी या परिसरातील नागरिकांचा विरोध होता. या आढावा बैठकीत ज्या नागरिकांचा विरोध होता त्यांना बोलावून त्यांचेशी चर्चा केली. आता त्या ठिकाणी तात्पुरते बॅरेकेटींग झुलता पुल बसविण्यात येणार आहे. त्यामुळे स्थानिकांना येथे येण्या–जाण्यासाठी आता अडचण येणार नाही.

कुंकूऐवजी फुले उधळण्यात येणार

शारदीय नवरात्र महोत्सवाचा सिमोल्लंघन हा महत्वाचा उत्सव असतो. सिमोल्लंघनावेळी काही मंदीर पालखीवर पोत्याने कुंकू उधळल्याने गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. त्यामुळे आता पालखीवर कुंकूऐवजी फुले उधळण्यात येणार आहेत

नगर परिषदेने शहरात बॅरेकेटींग लावणे, आवश्यक त्या ठिकाणी जंतूनाशक पावडरची फवारणी करणे, शहरातील अंतर्गत रस्ते दुरुस्त करुन स्ट्रीट लाईट लावणे, घाटशीळ, पापनाश व महाव्दार परिसरात २४ तास स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी असे असे त्यांनी सांगितले. तर प्रधिकरणावेळी करण्यात आलेल्या कामामुळे पोल काढण्यात आले आहेत, अशा ठिकाणी पोल बसवून घ्यावे. शहरात फिरणारी मोकाट जनावरे, श्वान व वराह यांचा बंदोबस्त करावा.कोंडवाडयाची व्यवस्था करावी. तसेच जनावरे मालकाकडून दंड वसुल करावा असे निर्देश तुळजापुर नागर पालिकेला त्यांनी दिले.

बोगस पुजाऱ्यांवर होणार कारवाई

मंदीरात अनुचित प्रकार घडू नये,तसेच भाविकांची फसवणूक होवू नये यासाठी आता बोगस पुजाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी तीन्ही पुजारी मंडळाच्या याद्यांची पुरर्तपासणी करण्यात येवून त्यांना क्यु आर कार्ड असलेले ओळखपत्र देण्यात येणार आहे.

श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय बंद होणार हा गैरसमज - डॉ. ओंबासे

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय हे बंद होणार अशा वेगवेगळ्या चर्चा होत आहेत. हा गैरसमज असून असे काहीही होणार नाही. उलट या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना अंमलात आणण्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बोर्ड ऑफ गव्हर्नन्सची बैठकीत हे महाविद्यालय बंद होणार नसल्याचा निर्वाळा जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे यांनी दि.२१ ऑगस्ट रोजी दिला.

तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयात बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये महाविद्यालयाचे प्रवेश वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व स्पर्धेमध्ये टिकाव धरून यशस्वी अभियंते निर्माण करण्यासाठी महाविद्यालयात सोयी सुविधा उपलब्ध करणे याबाबतचे नियोजन करण्यासाठी श्री.तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापकांना राज्यातील नामांकीत अभियांत्रिकी महाविद्यालये, आयआयटी, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे येथे पाठवून तेथे असलेल्या सर्व सुविधांचा अभ्यास करुन आपल्या विद्यार्थ्यांना देखील तशाच प्रकारच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्याचे ठरले. तर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी देशात व देशाबाहेर मोठ्या पदावर कार्यरत आहेत. काही विद्यार्थ्यांचे उद्योगधंदे आहेत. त्यांच्या मदतीने आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबत बैठकीमध्ये सूचना करण्यात आल्या. तसेच महाविद्यालय सर्व सोयींनी युक्त व विद्यार्थ्यांना परिपूर्ण अभियांत्रिकीचे शिक्षण देणारे महाविद्यालय म्हणून लौकीकास पात्र होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे डॉ. ओंबासे यांनी सांगितले.

मुली, महिलांच्या सुरक्षेसाठी मोफत ज्युडो कराटे प्रशिक्षण देणार - नळे

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – समाजातील काही विकृत मानसिकतेमुळे मुली आणि महिलांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे. परंतू अशा परिस्थितीमध्ये हिम्मत न हारता आत्मविश्वासाने सामोरे जाणे अत्यावश्यक आहे. या गोष्टीचा विचार करून आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य युवराज नळे यांनी सामाजिक दायित्वाच्या भावनेतून दि.१ सप्टेंबरपासून मुली व महिलांसाठी मोफत कराटे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सर्व प्रकारच्या वयोगटातील मुली आणि महिलांसाठी त्यांच्यात शारीरिक आणि मानसिक कणखरता निर्माण करण्यासाठी २ महिने मोफत कराटे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे. नळे हे कराटे क्षेत्रातील जुने अनुभवी मुख्य प्रशिक्षक (ब्लॅक बेल्ट ३ डिग्री) असून इंडियन तायक्वांदो ऍण्ड किक बॉक्सिंग असोसिएशन या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी यापूर्वी अनेक वर्षे कराटे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम केलेले आहे. यामध्ये इतरही काही असोसिएशन सहकार्य करणार आहेत. सद्यस्थितीत महिला व मुलींच्या मनात आत्मविश्वास निर्माण व्हावा व त्यांना स्वसंरक्षणाचे धडे मिळावेत या उद्देशाने कराटे क्षेत्रातील सहकारी भास्कर ढगे, प्रविण गडदे, हरिदास रोकडे, रफिक शेख, सुनील शिंदे, रणजित कोकणे, तानाजी माने, हरिश सुर्यवंशी, वैष्णवी सरडे, अपूर्वा कुलकर्णी अशा काही ब्लॅक बेल्ट सहकाऱ्यांसह प्रशिक्षण देण्याचा हा निर्णय घेतला आहे. या प्रशिक्षण शिबिरात फिजिकल फिटनेससह कराटेमधील स्वसंरक्षणाचे तंत्र, ज्युडो व लाठीकाठीचे प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नसून २ महिने सायंकाळी ५ ते ६ या वेळेत प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. त्यामुळे ज्या महिला व मुलींना आत्मसंरक्षण व आत्मसन्मानासाठी कराटे प्रशिक्षण घ्यायचे आहे त्यांनी खालील व्यक्तीकडे संपर्क साधावा. हरिदास रोकडे – ७८४१०३४६२८, योगिनी फुगारे – ९४०५६६०६०३, ऋतुजा खरे – ९३०७७८६७६५ व वैष्णवी सरडे – ९४०३७०७५९१ या क्रमांकावर दि.३० ऑगस्टपर्यंत संपर्क साधून नाव नोंदणी करावी असे आवाहन नळे यांनी केले आहे.

३ लाख ३३ हजार महिलांच्या अर्जाना मान्यता - डॉ ओंबासे

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – राज्य सरकारची मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. कोणतीही पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा प्रशासन विविध यंत्रणांच्या माध्यमातून काम करीत आहे. पात्र ठरलेल्या महिलेला दर महिन्याला दीड रुपये त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला म्हणजे १४ ऑगस्टपासून पात्र महिलांच्या बँक खात्यात रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. जिल्ह्यात जवळपास ३ लाख ५० हजारपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट आहे. बहुतांश पात्र लाभार्थी महिलांचे अर्ज भरले असून उर्वरित महिलांची अर्ज भरण्याची प्रक्रिया गतिमान झाली आहे.

जिल्ह्यातील ३ लाख ५६ हजार ६७३ महिलांनी या योजनेचा लाभ मिळण्यासाठी ऑनलाईन अर्ज केले. यापैकी नारीशक्ती ऍपवर १ लाख ७९ हजार ९२० महिलांनी केले आहेत. तर पोर्टलवर अर्ज भरणाऱ्या महिलांची संख्या १ लाख ७६ हजार ७५३ आहे. अशा एकूण ३ लाख ५६ हजार ६७३ अर्ज सादर केले आहेत. तर नारीशक्ती ऍपवर प्राप्त अर्जापैकी १ लाख ७५ हजार ७९१ महिलांच्या अर्जांना मान्यता दिली आहे. तर पोर्टलवर १ लाख ५७ हजार ७८१ अर्जाना मंजुरी दिली आहे. एकूण ३ लाख ३३ हजार ५७२ अर्जाना समित्यांनी मंजुरी दिली आहे. पहिल्या टप्प्यात ६ ऑगस्टपर्यंत अर्ज सादर केलेल्या साधारण १ लाख ३९ हजार ९०० महिलांच्या खात्यात रक्कम जमा झाली असून उर्वरित महिलांच्या बँक खात्यात ३१ ऑगस्टपर्यंत अनुदानाची रक्कम जमा होणार आहे. जिल्ह्यात ३ लाख २४ हजार ६५९ महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्याचे उद्दिष्ट होते. त्यापेक्षा जास्त महिलांनी अर्ज केले आहेत. ज्या पात्र महिलांचे अर्ज सादर करणे बाकी आहे त्या महिलांनी पोर्टलवर अर्ज करावेत. ज्या महिलांचे बँक खाते आधार संलग्न नसतील त्यांनी बँक खाते तात्काळ आधार संलग्न करून घ्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री वयोश्री योजना व मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेसाठी अर्ज करावेत - डॉ. ओंबासे

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – ज्या नागरिकांचे वय ६५ वर्ष व त्यावरील आहे. ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न २ लाख रुपयांच्या आत आहे, अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना व ज्यांचे वय ६० वर्ष व त्यावरील ज्येष्ठ नागरिक आहे. ज्यांचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपये आहे अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना राज्य सरकारकडून राबविण्यात येत आहे. या दोन्ही योजनेचा लाभ घेण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी अर्ज दाखल करावेत असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे यांनी केले आहे.

मनशांतीसह आध्यात्मिक पातळी गाठण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेची जिल्हयात अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुकास्तरावरील समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहात अर्ज करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. ज्या नागरिकांचे वय ६५ वर्ष व त्यावरील आहे व ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न २ लाख रुपयांच्या आत आहे, अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. ज्या ज्येष्ठ नागरिकांना वयोमानपरत्वे येणारे दिव्यांगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक साधने, उपकरणे खरेदी करण्यासाठी तर मनस्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना राबविण्यात येत आहे. तर ज्यांचे वय वर्षे ६० व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना व ज्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजाराच्या आत आहे, अशा ज्येष्ठ नागरिकांना देशातील मोठ्या तीर्थस्थळांना जाऊन मनशांती तसेच आध्यात्मिक पातळी गाठणे सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरु करण्यात आली आहे. अशा ज्येष्ठ नागरिकांनी दोन्ही योजनेसाठी समाज कल्याण, सहाय्यक आयुक्त यांच्या अधिनस्त असलेल्या तालुकानिहाय वसतीगृहात अर्ज सादर करावेत. योजनेची माहिती, अर्जाचा नमुना व सोबतची प्रपत्रे कार्यालयास http://samajkalyandharashiv.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

या वस्तीगृहात अर्ज करता येणार

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह धाराशिव कर्मचारी बी.ए. नाईकनवरे (७०८३४०८३८८), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह नळदुर्ग कर्मचारी मोहन शिंदे (९४२२९२३०४३), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह लोहारा कर्मचारी शरद माळी (७३५०६५०७२०), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह कळंब कर्मचारी संजय कांबळे (९९६०४८९६६३), डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह परंडा कर्मचारी प्रभाकर शेळके (७०२०६३४७०६), मागासवर्गीय मुलींचे शासकीय वस्तीगृह उमरगा कर्मचारी सुनंदा जेजुरे (९५५२४४६७१७), मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह वाशी कर्मचारी नासेरखान पठाण (८८८८१४२८६७), अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा,मुरुम ता.उमरगा कर्मचारी दत्तात्रय कुंभार (९४२०८३१४८२),अनुसूचित जाती व नवबौध्द मुलांची शासकीय निवासी शाळा,गोलेगाव ता.भुम कर्मचारी अण्णासाहेब शितोळे (९०२२०३९२३७),मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह तुळजापूर कर्मचारी पी.एस. राजपुत (८२०८५६६९७२) येथे अर्ज करावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे.

वाशी येथे टाटा पॉवर कंपनीच्या गोडाऊनवर धुडगूस

धाराशिव दि.२४ (प्रतिनिधी) – जिल्ह्यात सौर आणि पवनचक्की ऊर्जा निर्मितीचे प्रकल्प मोठ्या प्रमाणात उभारले जात आहेत. जगभरातील नामांकित कंपन्या हजारो कोटींची गुंतवणूक करत आहेत. मात्र गत काही महिन्यांपासून पवनचक्की माफियांचा मोठा धुडगूस सुरू आहे. खंडणी, मारहाण, तोडफोडीसह जिवे मारण्याच्या धमक्या देण्याचे प्रकारही वाढले आहेत. पवनचक्की माफियांनी प्रचंड दहशत माजविली असून उद्योजक कंपन्या जिल्ह्यात येण्यास धजावत नसल्याचे म्हटले जात आहे. वाशी येथील टाटा पॉवर कंपनीच्या गोडाऊनवर मोठा राडा झाला. या ठिकाणी एकाचा गळा दाबून कत्तीने बेदम मारहाण करत जबर जखमी केले. तर भांडण सोडविण्यासाठी आलेल्या सुपर वायझरलाही मारहाण करून जखमी केले. तसेच कामावर असलेल्या टिप्परसह जेसीबीच्या काचा दगडाने फोडून मोठे नुकसान केले. याप्रकरणी ७ जणाविरूध्द वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान अशा घटना वारंवार होत असून याकडे नूतन पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी लक्ष देवून गुंडप्रवृत्तीच्या लोकांवर कठोर कारवाई करून त्यांच्या मुसक्या आवळण्याची मागणी होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, वाशी परिसरात टाटा पॉवर कंपनी १०० मेगावॅटचा वीज प्रकल्प उभारत आहे. या प्रकल्पातून निर्माण झालेली वीज महावितरणच्या सबस्टेशनला पुरवली जाणार आहे. वाशी येथील साळुंके यांच्या पेट्रोल पंपाजवळ टाटा पॉवर कंपनीच्या गोडाऊनचे सध्या काम सुरू आहे. मात्र दि.२१ ऑगस्ट रोजी टाटा पॉवर कंपनीच्या गोडाऊनवर ७ जणांची मोठा राडा करत धुडगूस घातला. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सोलापूर–धुळे महामार्गालत साळुंके पेट्रोल पंपालगत टाटा पॉवर कंपनीचे गोडाऊन असून याठिकाणी काही कामगार कामाला आहेत. बुधवारी रात्री राजू उर्फ राजाभाऊ लक्ष्मण माने (वय ३४ रा.भूम), संतोष त्रिंबक जाधवर (रा. इसरूप), नाना बबन जोगदंड (रा. पिंपळगाव क), काकासाहेब शिवाजी धावारे (रा. मांडेगाव ता. बार्शी जि. सोलापूर), परमेश्वर मच्छिंद्र पवार (रा. सोनारी), सुमित दिलीप तेलंग (रा भूम), तानाजी साहेबराव धावारे (रा. बार्शी) यांनी २१ ऑगस्ट रोजी एनएच ५२ रोडलगत महावीर अर्जुन पवार (वय १९ वर्ष रा. वडर गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव) यांना नमूद आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून तुला कामाला येवू नको असे सांगितले असताना तु काम चालू केलेस असे म्हणून जीवे मारण्याच्या उद्देशाने गळा दाबून कत्तीने मारहाण मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच सुपर वायझर धनंजय गायकवाड हे भांडण सोडविण्यास आले असता त्यांनाही नमूद आरोपींनी शिवीगाळ करून लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच दगडाने हायवाचे व जेसीबीच्या काचा फोडून नुकसान केले. अशा मजकुराच्या पिर्यादी महावीर पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वाशी पोलीस ठाण्यात कलम १०९, ११५

(२), ३२४ (५), ३५१ (२), १८९ (२) ०९० सह ४/२५ भा.ह. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने मोठी खळबळ उडाली असून दहशतीचे वातावरण आहे. यापूर्वीही वाशी तालुक्यातील शेलगाव येथे पवनचक्की साईडवर १० ते १५ गावगुंडांनी धुडगूस घालत वाहनासह कार्यालयाची तोडफोड केल्याची घटना घडली होती. त्यातच पुन्हा असाच प्रकार घडल्याने मितीचे वातावरण पसरले आहे. याकडे नूतन पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी लक्ष देवून गुंडप्रवृत्तीच्या लोकांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

संपादकीय

कायद्यानेच गुन्हेगारीला आळा घालता येईल?

पुण्याच्या ससून रुग्णालयाचे निघालेले धिंडवडे हे थेट प्रमुखापासून रक्त बदलणाऱ्या वॉर्ड बॉयपर्यंत पोहोचले होते. ललित पाटील पलायन हाही विषय जुना नाही. निवासी डॉक्टरांना मिळणारी अमानवी गलिच्छ निवासी व्यवस्था हा तर त्यांच्या दर दोन वर्षांनी होणाऱ्या संपाचा प्रमुख विषय. यातूनच गेलेले डॉक्टर रुग्णालयांचे प्रमुख बनतात तेव्हा ते का निब्बर बनतात हा खरा प्रश्न. तीच गोष्ट विनयभंग व बलात्काराची. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी बलात्कार झालेल्या पीडितेची तपासणी करताना टू फिंगर टेस्टफ, वापरू नये ती चुकीची आहे असा आदेश कोर्टातर्फे द्यावा लागतो आणि तो अजूनही पाळला जातो की, नाही याची चौकशी अधिकाऱ्यांना माहिती नसते, तर कायदे कसले कसले करणार? आणि ते कोण व कसे राबवणार हा प्रश्न उभा राहतो.

डॉ. श्रीराम गीत - वैद्यकीय अभ्यासक

पुण्यात दोनशे खाटांच्या एका मोठ्या रुग्णालयात ५० वर्षांपूर्वी घडलेल्या एका प्रसंगात टॉन्सिलचे ऑपरेशन करायला चालत नेलेला सहा वर्षांचा मुलगा भूल देताना ऑपरेशन टेबलवर गेला. ही बातमी विभागप्रमुख व रुग्णालय प्रमुखांपर्यंत पाच मिनिटांत पोहाचली. त्यांनी मुलाच्या आई-वडिलांना स्वतः हाताला धरून ऑफिसमध्ये घेऊन नेले. काय घडले, कसे घडले व असे कसे घडू शकते याची योग्य त्या सांत्वनपर शब्दाचा वापर करून माहिती दिली गेली. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रसंगामध्ये ऑपरेशन थिएटरमध्ये काम करणाऱ्या कोणत्याही ज्युनियर डॉक्टरचा चुकून सुद्धा संबंध त्या दोघांनी येऊ दिला नाही. एक फार मोठी दुर्घटना टाळण्यात या अशा वर्तणुकीचा फायदा झाला.

तीस वर्षांपूर्वी पुण्यातील डेक्कन जिमखान्यावर जवळच असलेल्या शंभर खाटांच्या रुग्णालयात ४० वर्षांचा अपघातात पायाचे हाड मोडलेला रुग्ण सायंकाळी दाखल झाला. हाडाच्या डॉक्टरांना कळविण्यात आले व त्यांनी औषधोपचार सुरू करायला सुचवले होते. ऑपरेशन करायला लागणार असल्यामुळे त्याच्या तपासण्यांची सुरुवातही झाली होती. अचानक रात्री साडेनऊ वाजता रुग्णाला मोठा हृदयविकाराचा झटका आला. ड्युटीवरच्या दोन डॉक्टरांनी प्रयत्न करूनही पाच मिनिटांत रुग्णाचे निधन झाले. या गोष्टीशी रुग्णालयाचा दुरांव्ययानेही संबंध नव्हता. आजार जुना असावा. पाचच मिनिटांत रुग्णालयाचे प्रमुख खोलीत हजर झाले. काय झाले आहे याची ते माहिती घेत असताना बाहेर नातेवाइकांची गर्दी जमलेली होती. त्यातील एक वयस्कर व तीन दांडग्या तरुणांनी रुग्णालय प्रमुखांना खोलीच्या दरवाजात जखडून सांगितले, आता तुझ्याकडे बघतो व तुझ्या सकट हॉस्पिटल जाळून टाकतोफ, असे धमकावले. केवळ नशीब जोरावर म्हणून रुग्णालयातील मदतनीसांचा जथ्था तिथे हजर असलेल्या नातेवाइकांपेक्षा जास्त संख्येने होता म्हणून बेदम मार न खाता सुटका झाली. तासाभरात सुमारे २०० जणांचा जमाव रुग्णालयात जमला. तोपर्यंत रुग्णालय प्रमुखांनी घडलेल्या वास्तवाचे सोप्या माहितीतून अंगावर आलेल्या चौघांचे मनाजोगते शंका निरसन केले होते. त्यांनाच बरोबर घेऊन २०० जणांच्या जमावाला ते सामोरे गेले आणि त्याच चौघांनी जमावाला शांत केले. रुग्णालय प्रमुखांना बोलण्याची गरजही पडली नाही. या दोन्ही प्रसंगात मी साक्षी होतो. दोन्ही प्रसंगानंतर आठवडाभर माझी झोपही उडली होती हेही नमूद करायला हवे. स्वाभाविकपणे डॉक्टरांवर, रुग्णालयांवर होणाऱ्या विविध हल्ल्यांच्या संदर्भात कोणतीही घटना पेपरमधे शांतपणे वाचताना, काही वेळा संबंधितांकडून माहिती घेताना याला कायद्याने काही आळा घालता येऊ शकेल का? हा विचार पुन्हा पुन्हा समोर येऊनही त्याचे उत्तर निदान माझ्या पुरते तरी नकारात्मक येते. कारण कोणत्याही प्रसंगात भावनिक कोंडी झालेल्या व्यक्तीची रागाची वाफ स्फोटातून बाहेर पडते. पण त्याच वाफेला रोजच्या वापरातील प्रेशर कुकरसारखे शिट्टी वाजणारे सेफ्टी व्हॉल्व असले तर स्फोट टाळण्याची किमान शक्यता निर्माण होते. टळतोच असे नाही.

कायदा आणि हिंसा

कोलकत्यातील कार रुग्णालयात जे घडले किंवा बदलापूर येथे शाळेतील घटनेतून जे सामोरे आले ते कठोर कायदा करून टळेल हा एक भ्रम ठरणार आहे. लाखो वर्षांत उत्क्रांती होत मानवाचा जन्म झाला तरीही ज्ञात इतिहासात हिंसा नसलेले एकही वर्ष गेलेले नाही. तसेच उत्क्रांतीतील जनुकातून लैंगिक प्रेरणा पिढ्यानपिढ्या चालू राहते हेही वैश्विक सत्य आहे. या दोन्हींवर संस्कारांमुळे थोडीशी मात करता येते एवढेच. पण आदिम प्रेरणा संस्कारांवर कधी मात करेल हे कोणीच सांगू शकत नाही. पोलीस हे संरक्षणाकरता असतात. पण मग लीसकस्टडीत झालेल्या बलात्कार किंवा कैद्यांचा मृत्यू होतो तेव्हा हे गृहीतक खोटे ठरते. अशिक्षित किंवा गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे हैवान बनून बलात्कार करतात, असा समज जेव्हा विविध देशांच्या राष्ट्राध्यक्षांवर असे आरोप केले जातात तेव्हा पूर्णपणे खोटा ठरतो. लैंगिक चाळे, विनयभंग, बलात्कार हे सारे हिंसेचे एक विकृत स्वरूप आहे. पण हिंसा हीच जर आदिम प्रेरणा असेल तर ती कठोर कायद्याने थांबेल हा भाबडेपणाच झाला. पुराणातील कथांपासून आजपर्यंत विनयभंग किंवा बलात्काराच्या घटना घडतात.

युद्धकाळात त्याचे पीक फोफावते. बांगला देशातील आणि हमासने केलेल्या अत्याचारातील घटना सोडून द्या, पण मणिपूरमध्ये काय झाले ते तर विसरू नका. २०१७ सालापासून केरळमधील सिनेसृष्टीत चाललेल्या विनयभंग व लैंगिक अत्याचारांच्या गोष्टीचा अहवाल आजच छापून आला आहे. तरीसुद्धा फास्टट्रॅक खटला व फाशी या गोष्टींचा वारंवार उल्लेख संतप्त जमाव करत राहतो. विनयभंग किंवा बलात्कार याला आता जातीजातीचे परिमाण किंवा धर्माच्या छटा मिळत आहेत ही तर फारच वाईट गोष्ट. लहान मुलांना गुड टच किंवा बॅड टच शिकवा हे वाक्य तसेच. जेव्हा या मुलांना घरातीलच व्यक्तीकडून बॅड टच अनुभवायला मिळतो तेव्हाही खोटे ठरते. अशावेळी मुलांना खोटे ठरवण्याची सरसकट पद्धत घरोघरी रूढ असते. कायदे हे मोडण्यासाठी असतात अशी भारतीय परंपरा आपण स्वातंत्र्य लढ्यापासून शिकलो आहोत.**अपघाती मृत्यूनंतर**-रस्त्यात चारचाकी वा ट्रकचालकाची कोणतीही चूक नसताना झालेल्या अपघातात तो सरसकट मार खातो. ट्रकखाली आल्यामुळे मृत्यू झाल्यास स्वतःचा जीव वाचवण्यासाठी ट्रक ड्रायव्हर सरसकट पळून जातात व नंतर पोलीस ठाण्यात हजर होतात. संतप्त झालेल्या व काबूबाहेर गेलेल्या जमावाने पोलीस चौकीवर हल्ला करून पोलिसांना जाळण्याचा प्रयत्न करणे हेही आपण दर आठवड्याला वृत्तपत्रातील फोटोत पाहतो. किमान शंभर पत्रकारांचा दरवर्षीचा मारहाणीत झालेला मृत्यू ही गेल्या दशकाने ठेवलेली नोंद आहे. गेल्या शतकांत वाचलेले एक विधान येथे नमूद करावेसे वाटते. मोटर खाली एखादी व्यक्ती येऊन एक्सिडेंट झाल्यावर जर ड्रायव्हरचा पाय एक्सिलेटरवर जात असेल तर ती अमेरिका आहे आणि जर त्याने ब्रेक दाबला तर तो देश युरोपमध्ये असावा. थोडक्यात ज्याला त्याला स्वतःचा जीव प्यारा असतो. थोडक्यात डॉक्टरांवरील हल्ले कठोर कायदा करून कधीच थांबणार नाहीत.

पुण्याच्या ससून रुग्णालयाचे निघालेले धिंडवडे हे थेट प्रमुखापासून रक्त बदलणाऱ्या वॉर्ड बॉयपर्यंत पोहोचले होते. ललित पाटील पलायन हाही विषय जुना नाही. निवासी डॉक्टरांना मिळणारी अमानवी गलिच्छ निवासी व्यवस्था हा तर त्यांच्या दर दोन वर्षांनी होणाऱ्या संपाचा प्रमुख विषय.यातूनच गेलेले डॉक्टर रुग्णालयांचे प्रमुख बनतात तेव्हा ते का निब्बर बनतात हा खरा प्रश्न. तीच गोष्ट विनयभंग व बलात्काराची. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी बलात्कार झालेल्या पीडितेची तपासणी करताना टू फिंगर टेस्टफ, वापरू नये ती चुकीची आहे असा आदेश कोर्टातर्फे द्यावा लागतो आणि तो अजूनही पाळला जातो की नाही याची चौकशी अधिकाऱ्यांना माहिती नसते, तर कायदे कसले कसले करणार? आणि ते कोण व कसे राबवणार हा प्रश्न उभा राहतो. शेवटास एका नॅशनल चॅनलवर २० ऑगस्टला बदलापूर घटनेवर चर्चा करणाऱ्या दोन सुशिक्षित पण असंस्कृतफ महिलांतील झालेल्या भांडणाचा उल्लेख करतो. तीन वर्षे आठ महिने वयाच्या मुलीच्या आतड्यांपर्यंत जखमा झाल्या असे एक महिला दुसरीला खोट्या आक्रोशाने सांगत होती, तर दुसरी महिला तितक्याच आक्रोशाने तिच्यावर तुटून पडत होती. नाही नाही आतड्यापर्यंत आत काही गेले नाही. केवळ चार वर्षांच्या बालिकेच्या अंतर्भागाबद्दलचे हे आमच्या राजकीय स्त्री प्रवक्त्यांचे घोर अज्ञान. तर कायदे काय करणार? वाचकांनीच ठरवावे.

प्रदूषण रोखण्यासाठी लोकसहभाग गरजेचा

वातावरणातील बदलांमुळे मुंबईतील प्रदूषण वाढले आहे. या प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्याचे मुंबई महापालिकेचे विविध प्रकारच्या माध्यमातून प्रयत्न चाललेले असताना आता त्यावर आणखी प्रभावी उपाय म्हणून मुंबईत कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयत्न केला जात आहे. खरे म्हणजे असे केल्याने प्रदूषण थांबणार आहे का, असा प्रश्न निर्माण होतो. उलट त्यामुळे पैशांचा चुराडाच अधिक होईल. एरव्ही मुंबईत पावसाळ्याच्या दिवसांत चार महिने भरपूर पाऊस पडत असतोच. त्याने प्रदूषण थांबत नाही, तर आता कृत्रिम पाऊस पाडल्याने हे प्रदूषण थांबणार आहे का? हा प्रश्न आहे. याबाबत शासनाने प्रदूषण तज्ज्ञांचे मत जाणून घेतले आहे काय? तसे असेल आणि महापालिकेचा पैसा वाया जाणार नाही, हेही तपासून पाहिले पाहिजे.

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असली तरी देशातील गोरगरिबांचे मुंबई शहर जगण्याचे ठिकाण आहे. केवळ गरीबच नव्हे तर चाकरमानी, विविध क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, उद्योजक यांचेही मुंबई शहराशी नजीकचे नाते आणि त्यांचे व्यवहार अवलंबून असल्यामुळे मुंबईशिवाय ते राहू शकत नाहीत. मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबई शहरावर विविध बाबतीत ताण आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने मुंबईतील वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत, इमारती बांधकामे थांबविण्याचे आदेश दिले होते. त्याचबरोबर, मुंबईतील बांधकामाच्या ठिकाणी धूळ व प्रदूषण नियंत्रणासाठी आखण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी मुंबई महापालिकेने वॉर्डस्तरावर करण्यास सुरुवात केली आहे. वॉर्डस्तरावर नेमण्यात आलेल्या विशेष पथकांकडून पाहणी होत असून मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न झाल्यास काम थांबविणे किंवा ते सील करण्यात येणार आहे.

असो. दिल्लीपाठोपाठ मुंबईतील प्रदूषणाचे प्रमाण वाढले, यात शंकाच नाही. मुंबईत आधीच लाखोंच्या संख्येने वाहने आहेत. शिवाय बाहेरून येणारी वाहने काही कमी होत नाहीत. या वाहनांमुळेही वातावरणातील हवेत प्रदूषणाचा फैलाव होत असावा, असे वाटते. वास्तविक मुंबईत विविध प्रकारच्या माध्यमातून जे प्रदूषण निर्माण होत आहे, ते थांबवणे हे महापालिकेसमोर आणि राज्य सरकारसमोर मोठे आव्हात्मक काम आहे. मुंबई महापालिकेमार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच पाहणी केली. त्यात रस्ते, पदपथ आणि धूळ आदी कामांची पाहणी केली. यामधून निर्माण होणारे प्रदूषण रोखण्यासाठी प्रसंगी दुबईतील कंपनीशी करार करून कृत्रिम पाऊस पाडण्यात येणार असल्याचे सूतोवाच केले. तसेच एका दिवसाआड म्हणजेच तिसऱ्या दिवशी मुंबईतील रस्ते धुऊन साफ केले जातील. त्यासाठी एक हजार टँकर भाड्याने घ्यावे लागतील, असेही त्यांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्री जे काही म्हणत आहेत ते मुंबईकरांच्या दृष्टीने आणि मुंबईच्या आरोग्याच्या दृष्टीने समाधानाची बाब आहे. हे सर्व असताना मुंबईत जी विकासकामे सुरू आहेत, जसे मोठ्या इमारतींची कामे, इमारतींचे पाडकाम, मेट्रो रेल्वेची कामे व अन्य प्रकारच्या कामामुळे जी धूळ निर्माण होते, त्यातून निर्माण होणारे प्रदूषण आणि लाखो वाहनांच्या धूर आणि धुळीच्या कणांमुळे निर्माण होणारे प्रदूषण या सगळ्यांचा मनुष्य जीवनावर होणारा परिणाम किती घातक आहे, याची आपण कल्पनाही करू शकत नाही. धूळ प्रतिबंधक उपाय करण्याची गरज तर आहेच, यात दुमत असण्याचे कारण नाही. प्रदूषण रोखणे ही काळाची गरज आहे. लोकांनीही आपापल्या पद्धतीने काळजी घेण्याची गरज तर आहेच. शिवाय महानगरपालिकेचे कर्मचारी येतील आणि स्वच्छता करतील, असे त्यांच्या भरवशावर न बसता आपला परिसर कसा स्वच्छ राहील, हे पाहिले पाहिजे. त्यासाठी त्यांना काळजी घ्यावी लागणार आहे. मुंबई महापालिका सर्व बागांमध्ये अधिकची झाडे लावणार आहे. नव्हे त्याची अधिक गरज आहे. या झाडांमुळे धुळीचे कण रोखता येतील, शिवाय कार्बन डायऑक्साईड अधिक निर्माण करण्याचे काम ही झाडे करतील. प्रदूषण रोखण्यासाठी मुंबई महानगरपालिका प्रयत्नशील आहे, त्यासाठी विविध उपाय योजत आहे. रस्ते पाण्यामुळे साफ केल्यास धुळीचे कण उडणार नाहीत. हे सर्व असताना महापालिकेला मोठ्या खर्चाची तरतूद करावी लागणार आहे. मग त्यासाठी रस्ते धुण्यासाठी लागणारे टँकर, कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी होणारा खर्च सोसावा लागणार आहे. त्याचबरोबरीने आता मुंबईकरांनी प्रदूषण दूर व्हावे यासाठी सजग राहणे गरजेचे आहे.

आजार आहेत आणि उपायही

जागतिक एड्स दिन १ डिसेंबरला पाळला जातो. यायोगे एड्ससारख्या जीवघेण्या आजाराप्रति जागृती निर्माण करण्याचे काम सातत्याने होत असले तरी अजूनही बरेच काम होणे गरजेचे आहे. दुसरीकडे थंडीचा काळ सुरू होत आहे. या काळात देशभर अस्थमाग्रस्त रुग्णांची संख्या वाढताना दिसते. वाढत्या प्रदूषणामुळे आता ही समस्या अधिक गंभीर होत आहे. त्यामुळे याविषयीदेखील सविस्तर माहिती घ्यायला हवी.भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशातल्या आरोग्य समस्यांचा गंभीर प्रश्न सर्वज्ञात आणि सर्वश्रुत आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात अत्यंत तोकड्या आरोग्यसेवा आणि आरोग्याप्रति दुर्लक्ष करण्याची समाजाची मानसिकता या दोन कारणांमुळे हा देश नानाविध आजारांचे आश्रयस्थान बनत आहे, यात शंका नाही. दिवसेंदिवस हा प्रश्न उग्र रूप धारण करत आहे. त्यामुळेच दर वर्षी गंभीर आजारांप्रति जागृती निर्माण करण्यासाठी ठरावीक दिवसांचे औचित्य साधले जाते. या पार्श्वभूमीवर १ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक एड्स दिनाचे महत्त्व खूप मोठे आहे.गेली अनेक वर्षी एड्सप्रती जागरूकता निर्माण करण्याचे काम होत आहे. या जीवघेण्या आजारामुळे केवळ बाधित व्यक्तीच नव्हे तर संसर्गाने जोडीदारही या आजाराला बळी पडू शकतो. परिणामस्वरूप संपूर्ण कुटुंबाला अनेक समस्यांचा सामना करावा लागू शकतो, हे आणि यासारखे अन्य धोके लोकांसमोर आणले जात आहेत. मात्र इतक्या वर्षांच्या प्रयत्नांनंतरही जनसामान्यांना या दाहक व्याधीचे पुरेसे ज्ञान मिळाले आहे, असे म्हणता येणार नाही. म्हणूनच अजूनही बरेच काम बाकी आहे, असे यंदाच्या या दिनाच्या निमित्ताने म्हणावे लागेल. एड्सग्रस्तांची वाढती संख्या लक्षात घेता याला कलियुगातील भस्मासूर म्हटल्यास वावगे ठरू नये.वास्तविक, एड्सपासून बचाव करण्यासाठी गर्भनिरोधके उपलब्ध असूनही जनजागरणाच्या अभावामुळे या सुरक्षा यंत्रणेचा प्रभावी वापर होत नाही. याबाबत देशातील तरुण पिढीशी संवाद साधण्याची आवश्यकता आहे. तसे प्रयत्न शासन आणि काही स्वयंसेवी संघटनांमार्फत केले जात आहेत. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे एचआयव्हीबाधित व्यक्ती साध्या आजारांनाही बळी पडते. शरीरातील प्रतिकार यंत्रणा मोडकळीला आणणाऱ्या या विषाणूंचा एका शरीरातून दुसऱ्या शरीरात प्रवेश होण्याचे चार मार्ग आहेत. एक म्हणजे असुरक्षित शरीरसंबंध. दुसरा एचआयव्हीबाधित मातेकडून गर्भाला लागण होणे. तिसरा एचआयव्हीबाधित व्यक्तीने वापरलेल्या सुईचा निर्जंतुक न करता पुनर्वापर आणि चौथा अपघातग्रस्त अथवा आजारी रुग्णावर शस्त्रक्रिया करताना एचआयव्हीचे विषाणू असणाऱ्या रक्ताचा पुरवठा होणे. या चार मार्गांनी एचआयव्हीचा प्रसार होतो.एचआयव्हीची बाधा झाल्यानंतर तीन ते सहा महिन्यांत रुग्णामध्ये तीव्र ताप येणे, विशेष कारण नसताना वजनात सात ते आठ किलोची घट होणे, सातत्याने जुलाब होणे, सांधेदुखी, डोकेदुखी, थकवा, गळ्यावर अथवा काखेत गाठी येणे, तोंडाच्या आतल्या भागात फोड आढळणे, टीबी, मेनींजायटिस, न्यूमोनिया, रेटीनायटिस, हर्पिस हे विकार उद्भवणे, रात्रीच्या वेळी दरदरून घाम फुटणे आणि पोटदुखी, उलट्या होणे अशी लक्षणे आढळतात. त्यामुळेच यासारखी लक्षणे आढळल्यास त्वरित तपासणी करण्याची सजगता वाढणे गरजेचे आहे. खेरीज भारतामध्ये असुरक्षित

शरीरसंबंधांमुळे एचआयव्हीचा प्रसार होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. एचआयव्हीबाधित व्यक्तीसाठी वापरलेल्या सुयांचा वापर निरोगी व्यक्तीच्या उपचारात केल्यास एचआयव्हीचा प्रसार होतो. त्यामुळे कोणतेही उपचार घेताना रुग्णाने नव्या सुईच्या वापरासाठी आग्रह धरायला हवा. अमली पदार्थ शिरेवाटे घेणारे व्यसनाधिन तरुणही एचआयव्हीच्या प्रसाराला बळी पडतात. हेरॉईन अथवा गर्दसारखे अमली पदार्थ शिरेवाटे घेण्याची पद्धत सध्या रूढ आहे. हे व्यसनाधीन तरुण एकमेकांच्या सुयांचा वापर करतात. असे करताना त्यांना सुया निर्जंतुक करून घेणे शक्य असतेच असे नाही. त्यामुळे बरेचदा एचआयव्हीबाधित व्यक्तीने वापरलेल्या सुईचा पुनर्वापर होऊन एचआयव्हीचा प्रसार होतो.

विचारात घेण्याजोगा आणखी एक मुद्दा म्हणजे रक्तदान करताना अथवा रक्त स्वीकारण्यापूर्वी रक्तचाचणी करायला हवी. एचआयव्हीबाधित व्यक्तीचे गाढ चुंबन घेतल्यानेही एड्सचा प्रसार होतो. विशेषत: एचआयव्ही बाधित व्यक्तीच्या अथवा तिचे चुंबन घेणाऱ्या व्यक्तीच्या तोंडात जखमा असतील तर निश्चितच असा प्रसार होतो. दारूसारख्या अमली पदार्थांचे सेवन केल्यानंतर अनेकांना लैंगिक क्रियेत सहभागी व्हावेसे वाटते. अशा वेळी ते कंडोमचा वापर करतीलच याची शाश्वती नसते. त्यामुळे दारूचे व्यसन अप्रत्यक्षपणे एचआयव्हीच्या प्रसाराला कारणीभूत ठरते. असे असले तरी एड्सबाधित व्यक्तीला स्पर्श केल्याने, तिचे मलमूत्र हाताळल्याने, या व्यक्तीसोबत एकाच ताटात जेवल्याने, तिचे कपडे वापरल्याने अथवा सोबत वास्तव्य केल्याने या रोगाची लागण होत नाही. एचआयव्हीची बाधा आणि प्रतिबंध यासंबंधी योग्य वेळी माहिती न मिळाल्याने काही व्यक्तींना एचआयव्हीच्या बाधेला बळी पडावे लागले आहे.रोग आणि चर्चा करत असताना वाढत्या थंडीतील काही आजारांविषयी देखील सजग होणे गरजेचे आहे. सध्याचा काळ ऋतूबदलाचा आहे. वातावरणातील बदलामुळे या काळात अस्थम्याच्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसते. या काळात अस्थम्याचा त्रास जाणवण्याचे मुख्य कारण म्हणजे बदलत्या वातावरणाशी जुळवून घेताना श्वसनसंस्थेची ताकद कमी पडणे अथवा काही अडचणी जाणवणे. श्वासनलिका संवेदनशील असणाऱ्या रुग्णांना या दिवसात हा त्रास सोसावा लागतो. संसर्गामुळे संवेदनशील श्वासनलिका आकुंचन पावतात आणि अस्थम्याची लक्षणे जाणवायला लागतात. थंडी वाढू लागल्यानंतर वातावरणात परागकणांचे प्रमाणही वाढते. या दिवसात गवतफुलांचे प्रमाणही खूप जास्त असते. त्यामुळेच याची ॲलर्जी असणाऱ्यांना लगेच त्रास होण्यास सुरुवात होते. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे या काळात जमीन थंड राहते. साहजिकच गारव्यामुळे जमिनीलगत धुक्याची दुलई पसरते. ही बाबही अस्थम्याला कारक ठरते. खेरीज थंडीत हवेमध्ये अनेक दूषित कणांचा संचार असतो. प्रदूषणयुक्त वातावरणात असे घातक कण हवेत तरंगत राहतात.थंडीमध्ये पसरलेल्या धुक्यात हे कण अडकून राहतात आणि त्यांची बाधा होऊन श्वासनलिका प्रभावित होते.या समस्येचे आणखी एक कारण म्हणजे एरव्ही व्यायामाला अनुत्सुक असणारे लोकही थंडीच्या आल्हाददायक वातावरणात व्यायामासाठी बाहेर पडतात. मात्र त्यांच्या शरीराला व्यायामाची सवय नसते. त्यात वातावरणातील बदलाचा परिणाम होतो आणि व्यायामामुळे येणारा अस्थमा बळावतो. वेगवेगळ्या वयोगटातील व्यक्तींना अस्थम्याचा त्रास वेगवेगळ्या प्रकारे जाणवतो. लक्षात घेण्याजोगी बाब म्हणजे शरीर विकसित होत असतानाच अस्थमा जडतो. म्हणजेच वृद्धावस्थेत अस्थमा मागे लागत नाही, हे आपण लक्षात घ्यायला हवे. लहान मुलांना अस्थम्याचा जास्त धोका असतो. त्यांना मोठ्या माणसांसारखा दम लागत नाही, मात्र ती सतत खोकतात. सतत खोकला येणे हे अस्थम्याचे महत्त्वपूर्ण लक्षण आहे. मोठ्या माणसांना दम लागणे, छातीतून आवाज येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, श्वास अपुरा पडणे आदी लक्षणे जाणवतात. त्यातही पहाटेच्या सुमारास खोकल्याची तीव्रता वाढते.

एकंदरीतच अस्थमा हा त्रासदायक आजार असला तरी सध्या यावर अत्यंत परिणामकारक औषधोपचार उपलब्ध आहेत. यात श्वासावाटे घेता येणारी औषधे अधिक परिणामकारक सिद्ध होतात. औषधांचा इनहेल्ड डोस कमी लागतो. म्हणजेच तोंडाने दोन मिली औषध पोटात जात असेल तर श्वासावाटे दिल्या जाणाऱ्या औषधाचा २०० मायक्रोग्राम डोस पुरेसा असतो. याचे कारण औषध नेमकी गरज आहे तिथे पोहोचते. मात्र दुर्दैवाने आपल्याकडे श्वासावाटे घेतल्या जाणाऱ्या म्हणजेच इनहेल्ड औषधांप्रती हवी तेवढी जागृती झालेली नाही. आपल्याकडे आजही औषधे घेण्याची योग्य पद्धत अवलंबली जात नाही. अशा प्रकारे घेतल्या जाणाऱ्या इनहेलर्सची सवय लागू शकते असाही एक गैरसमज आढळतो. तो दूर करणे गरजेचे आहे.तोंडावाटे अनावश्यक प्रमाणात औषध पोटात जाते आणि काही परिणाम दाखवते. याचाच एक भाग म्हणून अशी औषधे घेतल्यानंतर हात थरथरणे, शरीरात कंप जाणवणे, अस्थिरता अथवा बैचेनी जाणवणे आदी त्रास सोसावा लागतो. मात्र श्वासावाटे घेतल्या जाणाऱ्या औषधांमुळे असा कुठलाही त्रास जाणवत नाही. या औषधांमुळे अस्थम्यावर लवकर नियंत्रण ठेवणे शक्य होते. थंडीच्या सुरुवातीच्या काळातच आपण या सगळ्यांची माहिती घेणे गरजेचे आहे. त्रास वा लक्षणांकडे लक्ष ठेवणे, गरज वाटताच तज्ज्ञांचा सल्ला घेणे, औषधांचा पूर्ण डोस घेणे आणि आवश्यक ती पथ्ये पाळणे या नियमांचे पालन केल्यास अस्थमा रुग्ण या आल्हाददायक वातावरणाचा आनंद घेऊ शकतात.-डॉ. दिलीप शिरसाठ

जीवनाचे सार: चार गोष्टी

जगातल्या प्रत्येक अडचणीची उकल शक्य आहे. मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे सातत्य, निष्ठा व प्रयत्न करण्याची क्षमता असेल तर त्यासाठी सर्व सोपे आहे. जीवनाला निरुपयोगातून उपयोगी बनवण्यासाठी अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्यांचा जीवनात समावेश केल्याने अडचणींचे समाधान होऊ शकते. या चार गोष्टींना जीवनाचे सार किंवा आधार सुद्धा म्हटले जाऊ शकते. सर्व प्रकारच्या विकारांचा त्याग, मिथ्यत्व सोडून साधेपणा ग्रहण करणे आहे, बंधने झुगारुन साहस व जीवनात अध्यात्माचा समावेश केला तर मनुष्याचे निरुपयोगी जीवन उपयोगी बनेल. त्याच्या जीवनात असंतोषाचा नाश होईल. त्याबदल्यात त्याच्या जीवनात आनंद, उत्साह, शांतता व समाधानाची वृद्धी होईल.

विकार मानवी जीवनातील सर्वात मोठा अडसर आहे. जो मानवास फक्त विकृती देतो तसेच उदारता, दान, दया, प्रेम या प्रवृत्तींना वंचित करतो. म्हणून त्याच्या भौतिक इच्छा इतक्या बळावतात की, संग्रह करणे मग ते योग्य-अयोग्य, कर्तव्य-अकर्तव्य, नातेवाईक-त्रयस्त, शोषण-पोषण याचा अजिबात विचार करत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, मर्यादा व धोरणे क्षुल्लक वाटू लागतात. अशाप्रकारे विकारांनी पिडीत मनुष्याच्या जीवनात शोक-संताप व अशांतता, असंतोषाशिवाय कुणाला आनंदाची संधी मिळू शकते? विकृती मनुष्याचा फार मोठा दोष आहे, याचा तात्काळ त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मनुष्याचे दोन दागिने मानले गेले आहेत. उदारतेचा गुण आपल्यातील इतर गुण त्यागण्यास प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्येपेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह धोरण व आदर्शा व्यतिरिक्त करत नाही. उदारता पुरुष मोक्षासाठी अंगीकारतो. उदार पुरुष धोरणाने मिळवलेल्या धन-धान्याने सुखी व समाधानी राहतो. अशा लोकांची प्रत्येक अडचण आपोआप सुटत राहते.

राशी भविष्य

२५ ऑगस्ट २०२३ (पीएसआय)

मेष: शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
नशिबावर सोडून दिलेले कामे पार पडतील. आर्थिक फायदा होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर राहतील.

वृषभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: दक्षिण
दूरदर्शिपणामुळे व चातुर्यामुळे अनेक अडचणीं पार पाडताल. कामातील गती कायम राखल्याने यश मिळेल. समाजातील प्रतिष्ठेत वाढ होईल. नवीन संबंध फायदेशीर राहतील.

मिथुन : शुभ रंग: गुलाबी: शुभ दिशा: दक्षिण
व्यवसायात यश मिळेल. अडकलेला पैसा मिळेल. अधिक विश्वास दाखवून कामे करू नका. भाग्याचे पूर्ण सहकार्य आज लाभणार आहे.

कर्क :शुभ रंग: पांढरा., शुभ दिशा: उत्तर
आपले प्रयत्न यशस्वी होतील. सन्मान व किर्तीत वाढ होईल. खर्च विचारपूर्वक करा. सरकारी कामे पार पडतील.कुटुंबात शुभ कार्याची चर्चा होऊन रूपरेषा आखली जाईल.

सिंह : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:पश्चिम
नवीन योजना फायदेशीर राहतील. मानसिक तणावापासून मुक्ति मिळेल. आळस सोडून द्या. स्थावर मालमत्तेचे काम पूर्ण होईल. संयम बाळगा.

कन्या :शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: उत्तर
मुलांच्या प्रगतीचे योग आहेत. कामात अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. शुभ संकेत मिळाल्याने आपले मन उत्साहित राहील. आर्थिक लाभ भरपूर होईल. परमेश्वरावरील विश्वासात वाढ होईल.

तुळ: शुभ रंग :जांभळा, शुभ दिशा: उत्तर
निंदा करण्यापासून दूर रहा. कामकाजात निर्माण झालेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांशी वाद होण्याचा संभव आहे. हाती कमी पैसा असल्याने आपले काम अपूर्ण राहण्याची शक्यता आहे.

वृश्चिक: शुभ रंग: निळा, शुभ दिशा:पश्चिम
आपल्या कामाची लोक स्तुती करतील. विचारपूर्वक काम केल्यामुळे कामकाजाची स्थिती भक्कम होईल. अहारावर नियंत्रण असू द्या. सार्वजनिक कामात यश मिळेल.

धनु: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर
रोजगारामध्ये बदल किवा नवीन संधी मिळतील. प्रत्येक कामात आपल्याला यश मिळेल. जीवनसाथीच्या भावनेकडे दुर्लक्ष करू नका.

मकर :शुभ रंग: पांढरा : शुभ दिशा: पश्चिम
योजनेनुसार काम केल्यास फायदा होईल. आई वडिलांशी असलेले संबध दृढ होतील. व्यापारा स्पष्टपणा राखा. व्यापार नौकरीत इच्छेप्रमाणे उन्नती होईल. वाचनाची गोडी वाढणार आहे.

कुंभ: शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: दक्षिण
आर्थिक तंगी वाढल्याने व कौटुंबिक अडचणीमुळे मानसिक स्थिती चांगली राहणार नाही. आपल्या योग्यतेचे मूल्यमापन होणार नाही. व्यक्तिगत समस्या निर्माण होईल.

मीन :शुभ रंग: लाल, शुभ दि

मुख्यमंत्री वयोश्री योजनेमुळे ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सुखकर बनण्यास होणार मदत

प्रत्येकी तीन हजार रुपयांचे मिळणार सहाय्य

मनः स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांना वयोमानपरत्वे भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक विविध समस्यांवर मात करुन त्याचे जीवनमान सुखकर करण्यासाठी राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यात येत आहे.

ज्येष्ठ नागरिकांना विविध आजारपणाचा सामना करावा लागतो. केंद्र शासनाने सुरू केलेल्या योजनेच्या धर्तीवर दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) संबंधित दिव्यांग, दुर्बलताग्रस्त ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक अक्षमतेनुसार सहाय्य साधने, उपकरणे पुरविण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करण्यात आली आहे.

असे आहे योजनेचे स्वरूप

ज्येष्ठ नागरिकांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी- ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर आदी सहाय्यभूत साधने, उपकरणे खरेदी करता येणार आहेत. मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी योगोपचार आदीचा लाभ घेता येईल. या योजनेकरिता राज्य शासनातर्फे १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एकरकमी ३ हजार रुपयांच्या लाभ देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक विभाग तसें राज्य शासनाद्वारे नोंदणीकृत योगोपचार केंद्र, मनःस्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्राचा ज्येष्ठ नागरिकांना लाभ घेता येणार आहे.

लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष

ज्या नागरिकांची ३१ डिसेंबर २०२३ अखेर वयाची ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे नागरिक या योजनेकरिता पात्र समजण्यात येतील. ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधार कार्डसाठी अर्ज केलेला असावा आणि आधारकार्ड नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्यास ओळख पटविण्यासाठी इतर स्वतंत्र ओळख दस्तऐवजही ग्राह्य धरण्यात येणार येईल.

लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयाच्या आत असणे आवश्यक असून याबाबत लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करावे. निवड किंवा निश्चित केलेल्या जिल्ह्यात एकूण लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असणार आहे. अर्जदाराने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. मात्र दोषपूर्ण, अकार्यक्षम उपकरणे आदीच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते. पात्र लाभार्थ्यांच्या बँकच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाल्यावर विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे देयक तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावे. संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करावे.

अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे आधारकार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराचे २ छायाचित्रे, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे योजनेचे लाभ घेण्यासाठी आवश्यक असणार आहे.

योजनेची अंमलबजावणी

लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे आदी कामे नोडल एजन्सी, केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था यांच्या माध्यमातून आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येणार आहे. तसेच लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरिता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. ही योजना वृद्धापकाळातील आरोग्यविषयक समस्या दूर करून आनंदी जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

६५ वर्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत.

लातूर जिल्ह्यात आतापर्यंत ३२ हजार अर्ज प्राप्त

मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी अर्ज स्विकारण्याची कार्यवाही लातूर जिल्ह्यात सुरू आहे. या अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातून आतापर्यंत सुमारे ३२ हजार ६३ अर्ज प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यासाठी ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी यांनी ज्येष्ठ नागरिकांना माहिती देवून अर्ज भरण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत.

संकलन :- जिल्हा माहिती कार्यालय, लातूर

भारतातील सर्वात मोठा आयकर छापा, सलग १० दिवस रात्रंदिवस मोजल्या नोटा

नवी दिल्ली २४ - इन्कम टॅक्स विभागाच्या छाप्याबद्दल ऐकून भल्याभल्यांनाही घाम फुटतो. आयकर विभाग वेळोवेळी अनेक श्रीमंतांच्या घरांवर छापे टाकून मोठ्या प्रमाणात बेकायदा रक्कम आणि मौल्यवान वस्तू जप्त करतो. देशातला आतापर्यंतचा सर्वात मोठा छापा कोणता आहे आणि त्यात किती रक्कम वसूल झाली आहे, हे तुम्हाला माहिती आहे का?

२१ ऑगस्ट रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आयकर विभागाच्या एका टीमचा सन्मान केला. या टीमने आजपर्यंतचा सर्वात मोठा छापा टाकला आहे. या टीमने गेल्या वर्षी ओडिशातल्या एका डिस्टिलरी ग्रुपवर छापा टाकून सर्वाधिक ३५२ कोटी रुपयांची रोकड जप्त केली होती.

पथकाला 'सीबीडीटी सर्टिफिकेट ऑफ एक्सलन्स'

भारतात आयकराला १६५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त भुवनेश्वरमध्ये एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात निर्मला सीतारामन यांनी आयकर अन्वेषण विभागाचे मुख्य संचालक एस. के. झा आणि अतिरिक्त संचालक गुरप्रीत सिंग यांच्या नेतृत्वाखालच्या पथकाला 'सीबीडीटी सर्टिफिकेट ऑफ एक्सलन्स' देऊन गौरव केला.

गुरप्रीत सिंग २०१०च्या बॅचचे इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस अधिकारी आहेत. त्यांनी गेल्या वर्षी ६ डिसेंबर रोजी कारवाईक्षम गुप्त माहितीच्या आधारे ओडिशातल्या एका डिस्टिलरी ग्रुपच्या अनेक ठिकाणांवर छापे टाकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

३ डझन मशीन, १० दिवस शोधमोहीम

आयकर विभागाची ही शोधमोहीम १० दिवस सुरू होती. या कालावधीत एकूण ३५१.८ कोटी रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. देशातल्या कोणत्याही एजन्सीच्या एकाच कारवाईतली सर्वात मोठी जप्ती म्हणून या मोहिमेची नोंद झाली आहे. या छाप्यादरम्यान आयकर विभागाने जमिनीवर स्कॅनिंग व्हील असलेली मशीन वापरल्या होत्या, जेणेकरून खाली दडलेल्या मौल्यवान वस्तूंची तपासणी करता येईल. याशिवाय विभागाने नोटा मोजण्यासाठी तीन डझन मशीन्सही मागवून घेतली होती. ही रोकड मोजण्यासाठी विविध बँका आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांची मदत घेतली गेली होती.

गुरू वचन

एखदा एका राज्याच्या महाराणीचा हिऱ्यांचा हार हरवला. हा हार राणीचा जीवापेक्षा प्रिय होता. यामुळे तिने त्यास शोधण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु तो कुठेही सापडला नाही. हारासाठी राणी परेशान झाल्याचे पाहून राजाने दवंडी दिली की, ज्या कोणालाही हा हार सापडला असेल त्याने तीन दिवसांच्या आत परत करावा, अन्यथा त्याला मृत्यूदंड देण्यात येईल.

योगायोगाने तो हार एका साधूला मिळाला. त्याच्या मनात हाराविषयी कसलेही आकर्षण नव्हते. परंतु त्याने या विचाराने तो हार स्वत:कडेच ठेवला की, हा हार शोधत-शोधत कुणीतरी त्याच्याकडे येईल आणि नंतर त्यास तो हार देवून टाकेल.

मृत्यूचे भय नाही

दुसऱ्या दिवशी त्याने राज्याची दवंडी ऐकली परंतु तो हार देण्यास न जाता तपश्चर्येत तल्लीन राहिला. राजाच्या दवंडीनुसार तीन दिवस उलटले होते.

चौथ्या दिवशी तो साधू हार घेऊन राजादरबारात पोहोचला. तेव्हा राजाला माहीत झाले की हार तीन दिवसांपासून साधूच्या जवळ होता तरीही तो देण्यास आला नाही. त्यामुळे राजाला राग आणि त्याने साधूला प्रश्न केला तू माझी दवंडी ऐकली नव्हतीस. त्यावर साधून उत्तर दिले, ऐकली होती परंतु मी हार परत करण्यास पूर्वीच आलो असतो तर लोकांनी विचार केला असता की, साधू असतानाही मरणाला घाबरून हार देण्यास आला आहे. तेव्हा राजाने विचारले आज चौथ्या दिवशी का आलास. त्यावर साधू म्हणाला मृत्यूची भीती नाही, परंतु कुणा दुसऱ्यांची संपत्ती मी आपल्याजवळ ठेवणे पाप समजतो. हारासारख्या छोट्या गोष्टीशी मला काहीही घेणेदेणे नाही. साधूचे हे बोलणे एकून राजाने शर्मेने मान खाली केली. सोबतच राणीला आपल्या चुकीची कल्पना झाली आणि तिने तो हार विकून त्यापासून मिळालेले पैसे गरीबांना वाटून टाकले.

उपदेशकथा

एकदा एका गांधीभक्तानं गांधीजींकडे सिगरेटच्या पाकिटावरचं एक लेबलच मुद्दाम पाठवलं. त्याच्यावर छापलं होतं, गांधीजींचं चित्र अन् त्या सिगरेटला नाव दिलं होतं, 'महात्मा गांधी सिगरेट'. आपल्या नावाचा तो दुरुपयोग बघून गांधीजींना अतिशय वाईट वाटलं. ते म्हणाले, 'माझ्या नावाने अनेक दुरुपयोग आहेतच झालेले पण जाणूनबुजून सिगरेटशी माझं नाव जोडून जितका अपमान झालाय माझा, तितका दुसऱ्या कशानंही झालेला नाही ! गोष्ट अशी आहे की, मला स्वत:ला तर दारुइतकंच धूम्रपानही भयानक वाटतं कारण धूम्रपान करणं ही एक अगदी घाणेरडी सवय आहे असंच माझं ठाम मत आहे. कारण असं की, या धूम्रपानामुळे माणसाचं अंत:करण मरून जातं आणि तसं होणं हे तर दारूहून वाईट कारण त्याचा दुष्परिणाम लगेच काही दिसून येत नाही आणि दुसरे म्हणजे ही अशी सवय आहे की ती एकदा जडली की मग सुटता सुटत नाही तसंच ती खर्चिकही आहे फार. आणखी असं की, विडी सिगरेट पिणाऱ्यांच्या श्वासाला पण घाण वास येतो. त्याच्या दातांचा रंगही बिघडतो. पुढे पुढे तर त्यानं कॅन्सरही होतो. कॅन्सर किती घातक हे आता कुणाला सांगायला नको ! गांधीजी पुढे म्हणाले, ज्यानं कोणी माझं नाव सिगरेटला दिलं त्यानं त्यासाठी माझी अनुमती काही घेतलेली नाही. जर या व्यापाऱ्यानं ही नावाची लेबल बाजारातून परत घेतली किंवा लोकांनी ही पाकिटे विकत घ्यायचीच नाहीत असं ठरवलं तर मी लोकांचा फार आभारी होईन.



व्यसन

कथा उपदेश : बिडी-सिगरेटचं व्यसन फार घातक आहे. ते लावून घेऊ नये.

श्रीसिद्धान्तशिखामणी -अमृतधारा

आदिप्रसादिस्थल

शिवप्रसादसम्पत्त्या शिवभावमुपेयुषि।
शिवादन्यज्जगज्जालं दृश्यते न च दृश्यते।।५९।।

भावार्थ : शिवप्रसादाच्या प्राप्तीने शिवभावसंपन्न झालेल्या त्या शिवयोग्याला हा जगाचा समूह शिवापेक्षा भिन्न असा दिसत नाही. अर्थात् त्याला भेदबुद्धीचा नाश झाल्यामुळे सागरतरंगन्यायाने सर्व काही शिवमय आहे, अशा दृष्टीनेच तो पाहात असतो.।।५९।।

२५ ऑगस्ट जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्म तारखेवर गुरूचा प्रभाव आहे. गुरू म्हणजे दुर्दम्य आशावाद, उत्साह, आनंदी वृत्ती, यश, कीर्ती, परोपकार बुध्दी. ज्ञान मिळवण्याची तुम्हाला स्वाभाविकच आवड आहे. आणि हे प्राप्त केलेले ज्ञान इतरांपर्यंत पोचवण्याचीही तुमची धडपड असते. तुमच्या व्यक्तीमत्वाच्या कक्षा सतत रूंदावत असतात. प्रत्येक माणसाबद्दल तुम्हाला मनापासून आपुलकी वाटते व त्याला वेळोवेळी मदत करण्यात तुम्ही तत्पर असता. कायदा सोडून, नीतिनियमांना झुगारून तुम्ही सहसा वागत नाही. आणि तरीसुध्दा सत्कर्माचे फळ आपोआप मिळाल्याने यश, प्रतिष्ठा मानमरातब तुमच्याकडे विनासायास चालून येतात. इतरजण तुमच्या चांगुलपणाचा फायदा उठवण्याचा धोका नेहमीच आहे. इतरांची कामे करता करता आपले ईप्सित अपुरे राहणार नाही याची काळजी घ्या. 'आधी सार्थ मग परमार्थ '. वजन प्रमाणाबाहेर वाढणार नाही याची काळजी घ्या. नाहीतर मधुमेह, रक्तदाब विकार उद्भवतील. पायदुखीचाही त्रास होऊ शकेल. कार्यक्षेत्र : शिक्षण, न्यायदान, बँकिंग वगैरे अनेक क्षेत्रात तुमच्या क्षमतेचा तुम्ही पुरेपुर उपयोग करून घेऊ शकता.

जिथे जास्तीत जास्त लोकांशी संबंध येईल व त्यांच्या गरजा पुऱ्या होतील अशा संस्था म्हणजे महापालिका, पतपेढ्या, सहकारी संस्था यामध्ये वरची जागा गाठणे तुम्हास कठीण जाणार नाही. अध्यात्माची आवड असल्याने तत्वज्ञान, धार्मिक पुस्तकांची प्रकाशने, पत्रकारिता, प्रबोधनपर वाङ्:मय यातही तुम्ही आपला ठसा उमटवू शकता.

प्रणयी जीवन : वैवाहिक जीवनात तुम्ही सुसंवाद, समाधान, संतोष यांना महत्व देता. प्रत्येकावरच मनापासून प्रेम करीत असल्याने तुम्हाला आपला साथी निवडणे थोडे कठीणच जाते. एकनिष्ठता, नीतीमत्ता यांची अपेक्षा स्वत:प्रमाणेच तुम्ही इतरांकडूनही करता. इतरांसाठी त्याग करण्याची तुमची तयारी असते. ज्यांचा जन्म जून २१ ते जुलै २० दरम्यान झाला आहे त्यांना जीवनसाथी निवडणे श्रेयस्कर ठरेल.

वर्षफल : नोकरीनिमित्त प्रवासावर करावा लागणारा खर्च हे या वर्षाचे वैशिष्टच आहे. खूप दूरचे प्रवास यात परदेश गमनाचाही योग येऊ शकतो. तीर्थयात्रा यांच्या खर्चाची तरतूद करा. जून मध्ये उधारी, जुनी येणी विनासायास वसूल होतील. ऑगस्ट मध्ये वैवाहिक जीवनात संशयाचे निराकरण वेळीच करून घेणे इष्ट. ऑक्टोबर - नोव्हेंबर मध्ये वजनावर नियंत्रण ठेवा नाहीतर गंभीर आजारांना सामोरे जावे लागेल.महत्वाची वर्षे : ३, १२, २१, ३०, ३९, ४८, ५७, ६६, ७५, ८४. भाग्यरत्न : पुष्कराज

याच जन्मतारखेची व्यक्ती : सावित्रीबाई फुले, प्रेमा नारायण

लग्नसराईच्या काळामध्ये फिट राहण्यासाठी अवलंबा हे उपाय

सध्या लग्नसराईचा काळ सुरू असून, आपल्यापैकी प्रत्येक जण ह्या समारंभांना आमंत्रित असाल, किंवा तुमच्या परिवारामधेच लग्नकार्य होत असतील. हा काळ अतिशय गडबडीचा असतो. सर्व समारंभांना उपस्थित राहताना आपल्या खाण्या-पिण्याच्या बाबतीत आपण काहीसे निष्काळजी होतो. तसेच काही वेळा शरीरास विश्रांतीची आवश्यकता आहे हे लक्षात येऊनही आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. या समारंभांच्या गडबडीमध्ये आपल्या तब्येतीची होणारी हेळसांड आपण नजरेआड करायचा प्रयत्न करतो खरा, पण नंतर हीच हेळसांड आपल्याला भोवते, आणि त्यातून आजारपण उद्भवते. पण या बाबतीत आपण थोडी काळजी सुरुवातीपासूनच घेतली तर ही लग्नसराईच्या काळातील धावपळ आपल्याला जड जाणार नाही.

लग्न समारंभ आणि तऱ्हे-तऱ्हेचे खाद्यपदार्थ हे गणित पक्के जुळलेले असते. आजकाल मुख्य जेवणाच्या पदार्थांसोबतच अन्य कित्येक तऱ्हेच्या पदार्थांची रेलचेल असते. विशेषत: चाट, पाणी पुरी, चायनीज पदार्थ, अश्या पदार्थांच्या काऊंटर्सच्या भोवती नेहमीच गर्दी पहावयास मिळते. आपण ही ह्या पदार्थांवर, इतर जेवणाच्या जोडीने ताव मारण्याचा मोह आवरू शकत नाही. परिणामी अपचन, पोट फुगणे, गॅसेस, ॲसिडीटी, पोट बिघडणे हे त्रास उद्भवतात. त्यामुळे लग्नसमारंभात जेवताना, सर्व पदार्थ थोडे थोडे खा. त्याने पोटही भरेल आणि आपला आवडता पदार्थ आपल्याला खायला मिळाला याचे समाधानही होईल. तसेच लग्नघरामध्ये सतत कामांमध्ये व्यस्त असलेल्यांनी ही दिवसभरात थोडे थोडे खात राहावे. त्यामुळे अंगामध्ये ताकद राहून थकवा कमी होतो. आपण मेजवानी मध्ये निरनिराळ्या खाद्यपदार्थांवर आनंदाने ताव मारीत असतो. पण त्या पदार्थांच्या द्वारे किती अनावश्यक कॅलरीज आपल्या शरीराम ध्ये जात असतात, याचा विचार आपण करीत नाही. या कॅलरीज खर्च करण्यासाठी आवश्यक तो व्यायाम घेणे देखील आवश्यक असते. त्यामुळे आपल्या व्यस्त दिनक्रमातून काही वेळ व्यायामासाठी जरूर द्यावयास हवा. व्यायाम केल्याने शरीरामध्ये स्फूर्ती येऊन मनही उल्लसित राहते. तसेच शरीराची पाचनशक्ती व्यायामामुळे चांगली राहून त्यासंबंधीचे विकार उद्भवत नाहीत.

या काळामध्ये स्वत:ला ' हायड्रेटेड ' ठेवायला विसरू नका, म्हणजेच भरपूर पाणी प्या. मेजवानीतील तेलकट, पचण्यास जड असे खाद्यपदार्थ खाल्ल्याने शरीरामध्ये अनेक तऱ्हेची टॉक्झिन्स जात असतात. भरपूर पाणी प्यायल्याने हे घातक पदार्थ शरीराबाहेर सहजी टाकले जातात. तसेच पाणी प्यायल्याने त्वचेची आर्द्रता टिकून राहते. पाणी पीत राहल्याने भूक ही नियंत्रणात राहील, आणि मनाला येईल ते पदार्थ, हव्या तितक्या प्रमाणात खाण्याचा मोह आवरणे जमू शकेल. आपल्या कडील लग्नसमारंभातील मेजवान्या अनेक गोड पदार्थांशिवाय अपुऱ्या म्हणायला हव्यात. पण गोड खाण्यावर नियंत्रण ठेवायला हवे. तसेच या काळामध्ये शारीरिक आणि काही प्रमाणात मानसिक थकवा देखील येत असतो. हा थकवा घालाविण्याकरिता दररोज थोडावेळ मेडीटेशन करावे.

सर्दी बरी होण्यासाठी दैनंदिन आहारामध्ये हे बदल करा

कफ वाढेल, व सर्दी-खोकला लवकर बरा होणार नाही अशी सर्वसाधारण समजूत पहावयास मिळते. पण थंडीच्या मोसमामध्ये सर्दी पडशाचा त्रास हा, या काळादरम्यान उद्भविणाऱ्या सर्वसामान्य विकारांपैकी एक आहे. या कारणानेच शरीरामध्ये उष्णता निर्माण करतील असे अन्नपदार्थ या काळामध्ये आपल्या आहारामध्ये समाविष्ट करण्याची, व काही पदार्थ वर्ज्य करण्याची परंपरा आपल्याकडे पूर्वापार चालत आली आहे. या काळामध्ये भाज्यांपासून बनविलेली सूप्स, तीळ, गूळ, इत्यादी पदार्थांचे सेवन जास्त खाण्याचा, आणि दही, केळी, व इतर थंड पदार्थांचे सेवन कमी प्रमाणात करण्याचा सल्ला दिला जातो. आता त्यामध्ये नेमका कोणता सल्ला मानवा हे आपल्याला सुचत नाही. त्यामुळे आहारामध्ये विचारपूर्वक काही बदल केल्याने सर्दी लवकर बरी होण्यास, व पुन्हा न उद्भविण्यास मदत होते.

सर्दी किंवा खोकला झाला की काही लोक केळ्यांना अजिबात फाटा देऊन टाकतात. केळे खाल्ल्याने छातीमध्ये कफ वाढेल, व सर्दी-खोकला लवकर बरा होणार नाही अशी सर्वसाधारण समजूत पहावयास मिळते. पण केळ्यामध्ये पोटॅशियम मोठ्या प्रमाणावर असून, आपल्या शरीरातील पाण्याची पातळी त्यामुळे नियंत्रित होते. तसेच केळ्यामधील कॅलरीज शरीराला आवश्यक ती ऊर्जा देतात. यामध्ये असलेले इलेक्ट्रोलाईटस आणि क्षार शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवितात. त्यामुळे सर्दी झालेली असताना देखील केळ्याचे सेवन करावे.

वैज्ञानिकांच्या मते क जीवनसत्व असलेली सर्व फळे व भाज्या शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढविणारी असून, त्यांच्या सेवनाने शरीराचा कोणत्याही इन्फेक्शन पासून बचाव होण्यास मदत होते.

क जीवनसत्व शरीरातील हाडे, पेशी आणि रक्तवाहिकांचे आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करते. तसेच आपण सेवन करीत असलेल्या अन्नामधील लोह शरीरामध्ये शोषले जाण्यासाठी देखील क जीवनसत्व मदत करीत असते. त्यामुळे सर्दी झालेली असताना देखील संत्री, पपई, टोमॅटो, आवळे, पेरू यासारख्या पदार्थांचे सेवन करणे अपायकारक नाही.

दह्याच्या सेवनाने आपण सेवन करीत असलेले अन्न लवकर पचण्यास मदत होते. दह्यामध्ये असलेले ' हेल्दी बॅक्टेरिया अन्नाच्या पचनास मदत करतात. त्यामुळे जर हवामान बदलल्यामुळे सर्दी झाली असेल, तर दही खाण्यास हरकत नाही. मात्र जर सतत सर्दी किंवा खोकला उद्भवत असेल, तर दही खाण्याआधी डॉक्टरांचा सल्ला अवश्य घ्यावा. तसेच रात्रीच्या वेळी दही, ताक हे पदार्थ खाणे टाळावे. तसेच काही व्यक्तींना दुध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या सेवनाने कफ होतो. अश्या व्यक्तींनी हे पदार्थ डॉक्टरांचा सल्ला विचारून मगच आहारामध्ये समाविष्ट करावेत. तसेच सर्दी झालेली असताना मैद्यापासून बनलेले पदार्थ, तळलेले पदार्थ, किंवा पचण्यास जड पदार्थ खाणे टाळावे.

मनोरंजक महाशब्दकोडे

आडवे शब्द

१. नमस्काराचा एकल शब्द
५. अत्यंत कृश माणूस
९. अपशकुन
१०. धाक
११. धनको
१२. कोलकाताचे विमानतळ
१३. दटावणी, धमकावणे
१५. चमक, मुरगळा
१७. राष्ट्र
१८. कलंक, बट्टा
२०. अशिलाची बाजू मांडणारा
२१. शर्यतीत धावणारे गोष्टीतील दोन प्राणी
२३. प्रचंड
२६. श्रेष्ठ पुरुष
२८. कणीदार
२९. कुंतीचे पुत्र
३०. दूर करणारा
३२. दुर्दशा
३३. बगीचा
३४. निकट, जवळ
३६. चांदी
३७. 'तर'च्या बरोबरच्या शब्द
३८. माणूस
३९. पुष्कळ
४०. च्या साठी
४२. जन्माचे प्रमाणपत्र
४३. बिनवासाचे पांढरे फूल
४४. डुक्कर
४६. सामान
४८. जात, जातीतील पोटभाग
५०. समशेर
५३. शिंपला, एक छोटी समुद्री प्राणी
५४. प्रश्न
५७. उत्तराधिकारी
५८. मदतनीस
५९. एक मंगल वाद्य
६१. गाव, नगर
६५. मगज
६७. माणूस
६९. ताप येण्यापूर्वीचे शहारे
७०. संगीतातील ठेका
७१. भटक्या गोसावी
७४. धर्मार्थ देणे
७५. अधाशी
७६. च्या देखत, समक्ष
७७. पालखी, मेणा
७८. पदार्थाचा सूक्ष्म भाग

उभे शब्द

१. राजमहाल
२. करपलेले पीक
३. जाणे-येणे, वहिवाट
४. युद्ध
५. गावप्रमुखाचे कार्य
६. महाराणा प्रतापचा घोड्याचे नाव
७. तात्काळ, ताबडतोब
८. दारूचा एक प्रकार
९. पंजाबातही प्रसिद्ध मराठी संत
११. औषध
१४. मुले-बाळे असलेला
१६. हालचाल
१९. हत्ती
२१. सूट, वाढीव मुदत
२२. स्त्रियांचा पंजाबी पोशाख
२४. भरभराट
२५. सैन्याचा विभाग
२७. चुका करत करत
२९. उपकार
३१. मातीचा कण
३२. अवाजवी
३३. पोते
३५. तृण
३७. जनन
३८. रेलचेल, विपुलता
३९. वनवास
४१. वर-वधूची मिरवणूक
४५. मिठाई तयार करणारा
४७. श्रीरामाची जुळे मुले
४९. नशा आणणारा, कैफी
५१. घाव, प्रहार
५२. जिव्हा
५३. कारखान्याचा मालक
५५. बारीक सारीक
५६. गुजराथी नृत्यप्रकार
६०. मऊ
६२. शिव! शिव!
६३. आवड, रुची
६४. सैन्याची तुकडी
६६. चांदणी
६८. अरण्य
७०. तारणारा



जाहीर नोटीस

उदगीर शहरातील व जिल्हातील सर्व जनतेस व हितसंबंधीतास माझे पक्षकार नामे चंदरराव वैजनाथ माळेवाडे यांनी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरून व दिलेल्या अधिकारावरून या जाहिर प्रघटनाव्दारे सुचित व जागृत करण्यात येते की मौजे उदगीर येथील सर्वे नं. ३०१/१ प्लॉट नं. ५० न.प.न. ४-१-१३११ पुर्व पश्चिम ४१ फुट दक्षिण उत्तर ४८ फुट एकुण क्षेत्रफळ १९६८ चौ. फुट असून माझे पक्षकार चंदरराव वैजनाथ माळेवाडे हे दिनांक ०२/०८/२०२४ उदगीर ते लातूर प्रवास करताना माझा पक्षकाराकडून सदरील मिळकतीची मागील लिंकींग खरेदीखत व एस.आर. आर. पावती गहाळ झाली आहे. ज्यामध्ये १. खरेदीखत के. २६४८/२०२१ दिनांक १०/०६/२०२१ ओरीजनल एस.आर.आर पावती २. खरेदीखत क्रं. २९२७/२०१५ दि. २५/०५/२०१५ ओरीजनल एस.एस.आर पावती ३. खरदीखत क्रं २१८/२००१ दिनांक ११/०१/२००१ आरीनल एस.आर. आर. पावती ४. खरेदीखत क्रं. २४७१/१९९५ दिनांक १६/०६/१९९५ आरीजनल खरेदीखत व ओरीजनल एस.आर.आर पावती व इन्डेक्स २ पिशवीत होते ते बस मध्ये प्रवास करताना गहाळ झाले आहे व ते शोधत असता सापडले / मिळाले नाही. त्यामुळे माझा पक्षकाराला मुळ ओरीजनल खरेदीखत व त्याची एस. आर. आर. पावती बँकेत गृह कर्जासाठी आवश्यक आहे.

तरी तमाम व हितसंबंधीतास या जाहीर प्रघटनाव्दारे सुचित करण्यात येते की वरील नमुद मिळकतीची नोंदणी प्रत मुळ / ओरीजनल खरेदीखत व एस.आर. आर. पावती कोणासही सापडली असल्यास वरील मोबाईल नंबरवर फफ्रोन करून व सदरील पत्यावर येवुन पाच दिवसाच्या आत आणुन द्यावे सबब जाहीर प्रघटन दिनांक २३/०८/२०२४

तर्फे
ॲड. विक्रम निळकंठराव संकाये
मो.नं. ९८६०२०७७७३,
९७६५४५१६२३

तहसिलदार, देवणी यांचे कार्यालय
(संकिर्ण विभाग)
जा.क्र. २०२४/संकिर्ण/जन्म-मृतयू/कावि- दि.०३/०७/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी कै. संग्राम जळबा कांबळे, रा. हंचनाळा ता.देवणी जि.लातूर यांचा मृत्यू स्वगृही दिनांक ०८.११.१९८५ रोजी झाला असुन मृत्यू नोंद वहीला त्याच्या मृत्यूची नोंद ग्राम पंचायत, कार्यालय, हंचनाळा ता.देवणी जि.लातूर यांच्या रजिस्टरला नोंद करण्यात आलेली नाही. सदरील कै. संग्राम जळबा कांबळे रा. हंचनाळा ता. देवणी जि.लातूर यांच्या मृत्यूची दिनांक ०८.११.१९८५ रोजीचा मृत्यूची नोंद नोंदणी रजिस्टरला घेणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थीकै. संग्राम जळबा कांबळे, रा. हंचनाळा ता. देवणी जि.लातूर याचा मृत्यु दिनांक ०८.११.१९८५ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासून ४५ दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवून आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणाचे म्हणणेन दाखल केलेले नसेल तर न्यायालयात सदरहु कै. संग्राम जळबा कांबळे, रा. हंचनाळा ता. देवणी जि.लातूर यांच्या मृत्यू नोंद नोंणी रजिस्टरला घेणे बाबत संबंधीतास आदेशीत करण्यात येईल.

दिआक- ०१.०७.२०२४
पुढील तारीख ३०.०८.२०२४

तालुका कार्यकारी अधिकारी तथा
तहसिलदार, देवणी

जाहिरनामा
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ९२/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार विमल भ्र. संतोष सावंत ज्यापेक्षा अर्जदाराचे पती नामे संतोष पांडूरंग सावंत हे दिनांक १०/१०/२०२३ रोजी मौजे टाकळी ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे टाकळी ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	वारसांचे नांव		वय	नाते	मयताशी
१)	विमल भ्र. संतोष सावंत	३२		पत्नी	
२)	सोनाली संतोष सावंत		१४		मुलगी
३)	सचिन संतोष सावंत	१२		मुलगा	
४)	सुमनबाई पांडूरंग सावंत	५०		आई	

अर्जदार विमल भ्र. संतोष सावंत व इतर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक ०६/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : १९/०९/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

जाहिरनामा
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र. ११५/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार गोविंद पि. शामराव गगणबोने, रा. डोंगरेवाडी ता.देवणी जि.लातूर ज्यापेक्षा अर्जदाराची बहिण नामे निर्मला शामराव गगणबोणे हे दिनांक ०३/११/२०१५ रोजी मौजे डोंगरेवाडी ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असून ते मौजे देवणी ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते त्यांचे वारसदार खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	वारसांचे नांव		वय	नाते	मयताशी
१)	गोविंद पि. शामराव गगणबोने	५९		भाउ	
२)	सुरेश पि. शामराव गगणबोने	४९		भाउ	

अर्जदार गोंविद पि. शामराव गगणबोने व इतर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certifcate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक २०/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २५/०९/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय. चाउस) क.लिपिक — शिक्का — (पी.एम.नाईकवाडे) (सहा.अधिक्षक)

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार उदगीर यांचे कार्यालय
(दंडणीय विभाग)
जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१४/०८/२०२४

जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार रामेश्वर अभंगराव गोदे रा. सोमनाथपुर ता.उदगीर यांचा मुलगा नामे भगवान रामेश्वर गोदे यांचा जन्म दिनांक १७/०५/२००९ रोजी मौजे सोमनाथपूर ता. उदगीर येथे झाला असून जन्म/मृत्यु नोंदवहीला त्यांची मृत्युची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील अर्जदार रामेश्वर अभंगराव गोदे रा. सोमनाथपूर ता.उदगीर यांनी यांचा जन्म नोंद जन्म/मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात दिनांक ०५/०८/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

